वा॰वा॰
१०५६

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा॰वा॰
दा. क्र. : १०५६

5n+7a

BVBK-0401756
BVBK-0401756

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
वा. क्र. १८५६ २८।२।८५
विषय वा.वा.


वाचनालय बा.वि.
१७५६
२८।२।८५

रोज मुलांना एक गोष्ट सांगा.
३६० गोष्टी आणि १२ पुस्तकांचा संच.

# आषाढ

पंढरीनाथ रेगे

BVBK-0401756



अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ, पुणे ३०

प्रकाशक
ना. गो. जोशी
अतुल बुक एजन्सी
प्रकाशन
३१७, नारायण पेठ
दैनिक प्रभातसमोर, पुणे ३०.
फोन नं. ४४९५४१

© सर्व हक्क सुरक्षित

पहिली आवृत्ती :
२३ जानेवारी १९८५

मुद्रक :
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०.

## राष्ट्रगीत

जनगणमन अधिनायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
पंजाब सिंधु गुजरात मराठा
द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा
उच्छल जलधितरंग ।
तव शुभ नामे जागे
तव शुभ आशिष मागे
गाए तव जयगाथा
जनगणमंगलदायक जय हे
भारत भाग्यविधाता ।।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे

मुलांचे मनोरंजन आणि बौद्धिक वाढ होण्यासाठी या कथा लिहिल्या आहेत. या कामी भारतीय सांस्कृतिक कोष आणि इतर पौराणिक कथा यांचे अनेक वेळा सहाय्य लाभले. या सर्वांचा मी ऋणी आहे. त्याबद्दल त्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

---

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) कालिदास कथा | ५ | १८) गुणांची पारख | २७ |
| २) जगन्नाथपुरी | ७ | १९) भामट्याची गोष्ट | २८ |
| ३) सगळे पोटाचे दूत | ९ | २०) न्यायाची सचोटी | ३० |
| ४) स्त्रीचं व्यवहारज्ञान | ११ | २१) प्रामाणिक ब्राह्मण | ३२ |
| ५) साधं जेवणच योग्य | १२ | २२) डोळे साफ उघडले | ३३ |
| ६) तापीची जन्मकहाणी | १३ | २३) थापाड्यांची जोडी | ३४ |
| ७) गंगाणीची कथा | १४ | २४) म्हणीचा प्रत्यय | ३५ |
| ८) आळशी बायको | १५ | २५) चतुराईनं नामुष्की टाळली | ३६ |
| ९) कुमारषष्ठी | १७ | २६) कुलाचा कलंक | ३७ |
| १०) आंब्याच्या आकाराची गोष्ट | १८ | २७) मूषक | ३८ |
| ११) एकादशीची गोष्ट | १९ | २८) प्रायश्चित | ३९ |
| १२) कमळं पाण्यातच का उगवतात ? | २० | २९) नामदेवाचा अहंकार | ४० |
| १३) कळसूत्री बाहुल्या | २२ | ३०) संगमरवरी फांदी | ४२ |
| १४) प्रसंगावधान | २४ | ३१) कथा दीपपूजेची | ४२ |
| १५) गुरुपौर्णिमा | २५ | ३२) आषाढ महिमा | ४५ |
| १६) रुद्रचा महिमा | २५ | ३३) समयसूचकता | ४६ |
| १७) देवीचा बळी हयुएन्सांग | २६ | ३४) से. बापटांचा सोबती | ४७ |
| | | ३५) रखुमाईची कथा | ४८ |

म. रा. सं. क., वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १७५६ - २८।२।८५
विषय बा.वा.

## १ कालिदास कथा

आषाढ शुद्ध १ : या तिथीला संस्कृत वाङमयातील महाकवी कालिदास याच्या स्मृतीदाखल कालिदास-दिन मानला जातो.

इ. स. च्या चवथ्या शतकाअखेर व पाचव्या शतकाच्या आरंभाच्या काळात कालिदास होऊन गेला असला पाहिजे, 'मेघदूत' या आपल्या खंडकाव्यात त्यानं मध्यप्रदेशातली अनेक स्थळं व उज्जयिनी नगर यांचं वर्णन अतिशय आपुलकीनं केलं आहे. त्या आधारे विद्वानांनी असा निष्कर्ष काढला आहे, की, कालिदास उज्जयिनीचा रहिवासी होता. 'भोजप्रबंध' या ग्रंथात त्याच्याबद्दलच्या काही दंतकथा दिल्या आहेत, त्यांतली एक अशी आहे—

कालिदास हा एका ब्राह्मणाचा बुद्धिवान तसाच देखणा मुलगा होता. पण दुर्दैवानं लहानपणीच आईबाप वारल्यामुळं एका गवळ्यानं त्याचं पालनपोषण केलं. त्यामुळं विद्येचे संस्कार त्याच्यावर होऊ शकले नाहीत. जवळच त्या राज्याची राजधानी होती. तर तिथल्या प्रधानानं आपला डाव साधण्यासाठी तिथल्या राजकन्येचं लग्न या देखण्या पण अशिक्षित मुलाशी लावून दिलं. आपला नवरा विद्या नसलेला मूर्ख माणूस आहे, हे पाहून राजकन्या त्याला टाकून बोलली आणि कालिदेवीची उपासना करण्यासाठी तिनं त्याला पाठवून दिलं. कालीची उपासना केल्यावर त्याला विद्वत्ता प्राप्त झाली व काव्यही स्फुरलं. तेव्हापासून त्याला कालिदास म्हटलं जाऊ लागलं.

अशा प्रकारे ज्ञान मिळवून तो घरी परतला. तेव्हा राजकन्येनं त्याला विचारलं, 'अस्ति कश्चित् वाग्विशेषः?' (तुझ्या वाणीत काही विशेष गुण आले का?) तिला उत्तरादाखल त्यानं 'कुमारसंभव' हे

आपलं काव्य घडाघडा म्हणून दाखवलं. ते ऐकून तिला समाधान वाटलं. त्यानंतर, राजकन्येमुळं आपल्याला ही विद्वत्ता लाभली, या कृतज्ञतेच्या भावनेनं तिला तो मातेसमान मानू लागला. तेव्हा ती संतापली आणि तिरमिरीसरशी तिनं त्याला शाप दिला– 'स्त्रीच्या हातूनच तुझं मरण ओढवेल !'

बेचैन झालेला कालिदास मग स्वच्छंदपणे वागू लागला. पुढं एकदा तो कुमारदास या आपल्या मित्राला भेटायला लंकेत गेला. तिथं एका गणिकेकडून त्याला कळलं की, राजानं एका श्लोकार्धाची समस्यापूर्ती करणाऱ्याला भलंमोठं बक्षीस जाहीर केलं आहे. तो संस्कृत अर्धश्लोक या अर्थाचा होता– 'एका कमळावरच दुसरं कमळ उगवतं असं ऐकलं आहे; पण कधी पाहिलं मात्र नाही.' तर कालिदासानं 'बाले, तुझ्या मुखकमळावर दोन निळी (नेत्ररूपी) कमळं दिसतात ती कशी?' अशा अर्थाची श्लोकपंक्ती तत्काळ रचून ती समस्यापूर्ती केली. ती ऐकून ती गणिका थक्क झाली. तिच्या कपटी मनात आलं–ही समस्यापूर्ती आपलीच म्हणून सांगून राजाचं बक्षीस आपण उपटावं. पण हे काम साधण्यासाठी कालिदासाचा काटा काढायला हवा होता. म्हणून त्या स्वार्थी, दुष्ट गणिकेनं कालिदासाचा खून करविला. मित्राचा खून झालेला पाहताच कुमारदासाला एवढं दुःख झालं, की ते असह्य होऊन त्यानं कालिदासाच्या चितेवर अंग टाकून स्वतःला जाळून घेतलं. त्या गणिकेचा गुन्हा मात्र उघडकीस आला.

कालिदासाची काव्यसंपदा हा भारतीय संस्कृतीचा जणू प्रातिनिधिक ठेवा आहे. त्याच्या प्रत्येक कलाकृतीनं त्यागमय प्रेमाची महत्ता वर्णिली आहे. कोणतीही गोष्ट त्याग व तपस्या यांच्या आधारावरच दिव्य बनते, असा त्याचा सांगावा असल्याचं दिसून येतं. त्याच्या अलौकिक प्रतिभेनं मानव व निसर्ग यांना एकजीव करून सोडल्याचं प्रत्यंतर त्याच्या काव्यात येतं.

# २ जगन्नाथपुरी

ओरिसातील जगन्नाथपुरी या तीर्थक्षेत्रात जगन्नाथाचं प्रख्यात मंदिर असून आषाढ शु. द्वितीयेला तिथं रथयात्रेचा भव्य उत्सव होतो. आठ दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी अखिल भारतातून लक्षावधी यात्रेकरू गोळा होतात. जगन्नाथाचा रथ ओढण्याच्या कामी आपले हात लागावेत यासाठी यात्रेकरूंची धडपड चाललेली असते.

या रथाच्या चाकाखाली चिरडून मेलेल्यांना मोक्ष लाभतो, या अंधश्रद्धेपायी पूर्वीच्या काळी काही भाबडे भाविक रथाखाली स्वत:ला घालून घेत व प्राणत्याग करीत.

जगन्नाथाचं हे स्थान अतिशय पवित्र मानलं जात असून या मंदिरात जगन्नाथ (श्रीकृष्ण), बलराम व सुभद्रा यांच्या लाकडी मूर्ती आहेत. या मूर्ती ओबडधोबड असून त्यांना हातपाय नाहीत. डोळे, नाक व तोंड हेच काय ते अवयव आहेत. कृष्णाबरोबर रुक्मिणीऐवजी सुभद्रा असलेलं हे स्थान अपवादात्मक मानलं जातं.

जगन्नाथाविषयी एक आख्यायिका सांगतात ती अशी—

भारतीय युद्धानंतर श्रीकृष्णानं देहत्याग केला, तेव्हा त्याचा बेंबीचा भाग चितेत जळेना. तो भाग मग समुद्रात सोडण्यात आला. तो वाहत वाहत नीलाचलाजवळ किनाऱ्याला लागला. तिथं इंद्रद्युम्न राजा तप करीत होता. त्याला स्वप्नात दृष्टान्त झाला— 'माझ्या देहाचा हा अवशेष लाकडी मूर्तीत बसव आणि तिची स्थापना करून तिची उपासना कर.' त्याप्रमाणे राजानं जी मूर्ती घडवून स्थापन केली, तीच जगन्नाथाची मूर्ती.

गंग वंशातील राजा चोडगंगदेव यानं इ. स. १२ व्या शतकाच्या प्रारंभी किंवा त्या शतकाच्या अखेरीस राजा अनंग भीमदेव यानं पुरी येथील जगन्नाथाचं भव्य मंदिर बांधलेलं दिसतं. नीलगिरी या टेकडीवर उभारलेल्या या मंदिराभोवती दुहेरी कोट आहे. दगडी भिंतीच्या या कोटाची लांबी ६६५ फूट असून रुंदी आहे ६४० फूट. २० फूट उंचीच्या या कोटाला प्रत्येक बाजूला मध्यभागी एक दार आहे. पूर्वेकडल्या महा-

द्वाराला सिंहद्वार म्हणतात. कारण त्यावर सिंहाच्या दोन मोठाल्या आकृती आहेत. या द्वारासमोर काळ्या पाषाणाचा स्तंभ उभारलेला आहे, तो कोणार्क येथून आणलेला आहे. देवालयात सगळीकडं सुंदर कोरीव चित्रं आहेत.

देवालयाच्या आवारात विविध देवतांची अनेक मंदिरं आहेत. त्यांत तेरा शिवमंदिरं व एक सूर्यमंदिर आहे. इथल्या चंदन तलावात स्नान करून लाल वस्त्र नेसायचं, आणि मग सूर्याला अर्घ्य देऊन जगन्नाथाच्या दर्शनाला जायचं, असा प्रघात आहे. रत्नवेदीवर उभ्या ठाकलेल्या सावळ्या रंगाच्या जगन्नाथाच्या माथ्यावर मुकुट, कानांत कुंडलं व ललाटावर हिरा चमकत असतो: बाजूला ६ फूट व्यासाचं तांबडं सुदर्शन चक्र आहे.

या मंदिरात शिजलेला भात देवाचा प्रसाद म्हणून वाटतात.

रथयात्रेचा सोहळा असा असतो–

कृष्ण, बलराम व सुभद्रा यांच्या मूर्तींसाठी तीन वेगवेगळे मोठाले रथ दरसाल नवे बनवतात. त्यांत ठेवलेल्या त्यांच्या उत्सवमूर्तींसह सिंहद्वारापासून रथयात्रा सुरू होते. मैलभर अंतरावर जनकपूर किंवा इंद्रद्युम्नप्रासाद आहे. तिथवर ही यात्रा जाते व तिथं तीन दिवस मुक्काम करून मग परतते.

मार्कंडेयसरोवर, कृष्णवट, बलरामसमुद्र व इंद्रद्युम्नकुंड ही इथली मुख्य तीर्थस्थानं.

आद्य शंकराचार्यांनी भारतभर स्थापलेल्या चार धर्मपीठांतलं एक पीठ जगन्नाथपुरीत आहे.



# ३ सगळे पोटाचे दूत

कोणे एके काळची गोष्ट. त्यावेळी वाराणसीचा ब्रह्मदत्त राजा भोजनप्रिय होता. नाना पक्वान्नांनी भरलेलं त्याचं जेवण असे. विशेष म्हणजे ते पदार्थ चारचौघांसमोर खाण्यात त्याला मौज वाटे. आपली ही हौस भागवण्यासाठी राजवाड्यालगतच त्यानं मंडप उभारला होता. त्यात मध्यभागी भल्यामोठ्या चौरंगावर बसून तो मिटक्या मारीत जेवायचा. आपला भोजनाचा डामडौल इतरांना दिसावा, म्हणून अमात्यांना बोलावून याच वेळी राजा त्यांच्याशी राज्यकारभारासंबंधी काही-ना-काही बोलायचा.

एके दिवशी राजा असाच जेवायला बसला होता. तर त्याचवेळी एक ब्राह्मण दरवानांना गुंगारा देऊन धावतच राजापुढं येऊन थडकला. आगंतुक ब्राह्मण बेधडक आत घुसलेला पाहून राजाचे सेवक तलवारी



उगारून त्याच्या अंगावर धावले. तेवढ्यात, ‘ मी दूत आहे...मी दूत आहे,’ असं तो मोठ्यांदा ओरडला.

दूत म्हटला, की त्याला राजापुढं जाण्याची मुभा असे. म्हणून राजा त्याला अभय देत, सेवकांना थोपवीत म्हणाला :

“ अरे, दूत आहे तो. त्याला पकडायचं किंवा मारायचं नाही.”

राजाचं अभय मिळताच ब्राह्मण थेट राजाच्या शेजारी जाऊन बसला आणि तिथं पक्वानांनी भरलेलं एक ताट बाजूला ठेवलं होतं, ते पुढ्यात ओढून घेऊन तो चक्क जेवायला लागला.

दूत उपाशी असावा अशी राजाची समजूत झाली. आणि त्यानं त्याला पोटभर जेवण वाढायला सांगितलं.

पोटभर जेवून ब्राह्मण समाधान पावताच राजानं त्याला विचारलं : “ बऽरं ! आता सांगा बघू कोणत्या राजाचे दूत म्हणून आलात आपण ? काय संदेश आणलाय् ?”

“ तसा मी कुण्या राजाचा दूत नाही, महाराज,” ब्राह्मण आता स्पष्टपणं म्हणाला, “ आपल्या प्रजाजनांतलाच गरीब ब्राह्मण आहे मी.”

“अरेच्चा !” राजा चिडून उद्गारला. “ तर मग आपण दूत आहोत, असं का ओरडलास मघा तू ? या खोटेपणाबद्दल कडक शासन करायला हवं तुला.”

“ पण मी खोटं नाही बोललो, महाराज,” ब्राह्मण खुलासा करीत म्हणाला, “ मी कुणा राजाचा दूत नसलो, तरी मी माझ्या पोटाचा दूत आहे. भुकेल्या पोटाच्या प्रेरणेनं भूक भागवण्याबद्दलचा त्याचा संदेश घेऊन मी तातडीनं आपल्याकडं आलो. आपण भोजनाचा एवढा पसारा मांडलाय. त्याअर्थी पोटपूजेचं महत्त्व आपण जाणताच.”

ब्राह्मणाचं ते बोलणं ऐकून राजा चकित झाला. विचारात पडला. किंचित वेळानं तो बोलला : “ हे ब्राह्मणा, तू बोललास त्यात बरंच तथ्य आहे. सारेजणच आपापल्या पोटाचे दूत आहेत. मी तर माझ्या पोटाच्या आहारी गेलेला, अगदी गुलाम बनलेला, हलक्या दर्जाचा दूत आहे. केवळ पोटपूजेसाठी मी हा एवढा पसारा मांडलाय् अन् त्यातच खुशाल आनंद मानून राहतोय्. मी पक्वान्नांचं वारेमाप जेवण फस्त

करतो; तर तुझ्यासारखे गरीब प्रजाजन पोटभर जेवणालाही मुकता आहेत. तू माझे चांगले डोळे उघडलेस. याबद्दल तुझ्या पोटाला यापुढं कधीही काही कमी पडू नये, अशी चोख तजवीज करतो मी."

आणि मग राजानं त्या ब्राह्मणाच्या उदरनिर्वाहाची कायमची सोय करून दिली. एवढंच नव्हे, तर स्वतःच्या जेवणाचं अवडंबर माजवण्याचं सोडून देऊन गरीब प्रजेच्या हिताकडं तो तत्परतेनं लक्ष देऊ लागला. (जातककथेवरून)

## ४ स्त्रीचं व्यवहारज्ञान

एका शहरात एक डॉक्टर शस्त्रक्रियेत प्रवीण होता. घरच्या घरीच त्याचा दवाखाना होता. एकदा जवळच्या एका कारखान्यातला एक कामगार डॉक्टरांकडं आला. अस्वस्थपणे म्हणाला, " डॉक्टरसाहेब. काम करताना माझ्या या उजव्या डोळ्यात लोखंडाचा मोठाला कण गेलाय बघा. डोळा नुसता कसकसून राहिलाय, जीव बेजार झालाय. तेवढा जरा काढून टाका."

डॉक्टर साहेबांनी आपल्या शस्त्रांच्या पेटीतून बारीक सळी, चिमटा, वगैरे काढलं. त्यांच्या साहाय्यानं लोखंडाचा कण काढायचा प्रयत्न ते करू लागले. पण काय असेल ते असो, बराच वेळ झाला तरी त्यांच्या प्रयत्नाला यश येईना. आता काय करावं, ते त्यांना सुचेना. मग कामगाराला तसेच दवाखान्यात बसवून ते जरा चहा प्यायला म्हणून घरात गेले. बायकोनं विचारलं, " काय चाललंय एवढा वेळ !" डॉक्टरसाहेब बोलले, ' अग, डोळ्यात लोखंडाचा कण गेलाय एवढी साधी तर बाब आहे. पण नेहमीच्या उपकरणांनी इतका वेळ जमतच नाही काढायचं. काय करावं..."

" अहो ! साधी गोष्ट आहे. एवढं शस्त्राचं अवडंबर हवं कशाला त्याला ?" बायको लगेच म्हणाली, " लोहचुंबकानं काम साधेल की लगेच."

एवढी साधी. सोपी युक्ती आपल्याला एवढा वेळ कशी सुचली नाही, याचं स्वत:शीच नवल करीत डॉक्टरसाहेब तडक बाहेर गेले आणि लोहचुंबकाच्या साहाय्यानं लोखंडाचा तो कण त्यांनी चटकन बाहेर काढला. काही क्षणांचाच मामला ! ...

## ५ साधं जेवणच योग्य

एका शेतकऱ्याकडं दोन बैल होते. थोरल्याचं नाव होतं महालोहित, तर धाकट्याचं नाव होतं चुल्ललोहित. सालूक नावाचा एक डुक्करही त्याच्या घरी होता. या डुकराला भरपेट खायला घालण्यात येई. हा प्रकार नेहमीनेहमी पाहून धाकटा बैल एकदा थोरल्यापाशी कुरकुरला–

" काय रे दादा, आपण या शेतकऱ्यासाठी एवढं खपून धान्यपैदाशीला हातभार लावतो. पण तरीसुद्धा केवळ कडबा अन् भुसा यावर आपली बोळवण केली जाते. तेच त्या खुशालचेंडू सालूक डुकराची कशी तैनात होते पहा. खाऊनपिऊन उंडारावं, यांशिवाय दुसरं कसलं काम नाही त्याला. मजा आहे बेट्याची."

" बाबा रे, तेवढ्यावरून बेचैन होऊ नकोस," थोरला बैल त्याला समजावीत म्हणाला, " आपल्या वाट्याला येत असलेलं खाणं पुरेसं आहे. दिवसभरच्या कष्टानंतर कडबासुद्धा गोड लागतो. कडबा–भुसा चांगला पचतो. सालूक डुकराबद्दल म्हणशील, तर त्याचा बडेजाव ठेवण्याचं इंगीत लवकरच कळेल तुला. त्याची चैन अल्पकाळाची आहे. आपल्या धन्याच्या घरी मंगलकार्य होईल, तेव्हा कळून चुकेल, की आपला भुसा-कडबाच भला. अरे बाबा, चैन करून आयुष्य वाढत नाही, की आरोग्य लाभत नाही, हे नेहमी ध्यानी बाळग."

त्यानंतर थोड्याच दिवसांनी त्या शेतकऱ्याच्या घरी लग्नकार्य निघालं. अर्थात पाहुणेमंडळी जमली, तेव्हा सालूक डुकरावर संक्रान्त

आली. त्याचे हातपाय बांधण्यात येऊन त्याच्या मानेवर सुरी फिरवण्यात आली. अर्थात तो आकांतून ओरडू लागला. साहजिकच ती ओरड त्या बैलांच्या कानी पडली. तेव्हा धाकटा चुल्ललोहित बैल थोरल्याला बोलला –

"दादा, तुझं म्हणणं अगदी खरं ठरलं! सालूकनं थोडे दिवस चैन केली खरी, पण त्याचं आयुष्य अल्प ठरलं. आपलं भुसा-कडबा हे साधं खाणंच आपल्याला योग्य आहे. आपलं आरोग्यही ठीक आहे. आपल्या जिवाला काही बाधा पोचेल असं वाटत नाही."

## ६ तापीची जन्मकहाणी

भारतातील प्रख्यात नदी तापी हिचा जन्म आषाढ शुद्ध सप्तमीला झाला, असं 'तापी माहात्म्य' या ग्रंथात म्हटलं आहे. तर दरसाल या दिवशी तापीचा जन्मोत्सव, तापीच्या तीरावरील तीर्थक्षेत्रात साजरा करतात. तापीचं पाणी व धान्य यांनी भरलेले कुंभ या दिवशी दान केल्यास मोठं पुण्य पदरी पडतं असं म्हणतात.

'तापीच्या केवळ स्मरणानं सर्व पापांचा नाश होतो' अशी भाविकांची पूर्वापार श्रद्धा आहे. तपती, ताप्ती, तापिका व तापिनी अशा विविध नावांनी पुराणात या नदीचे उल्लेख आढळतात. महाभारताच्या आदिपर्वात तिच्याबद्दलची माहिती दिली आहे, ती अशी–

तापी ही सूर्यकन्या असून तिचा विवाह संवरण राजाशी झाला होता. कुरुवंशाचा संस्थापक कुरू हा तिचाच पुत्र. बळरामानं तीर्थयात्रा करताना तापीचं दर्शन घेतलं होतं.

मध्यप्रदेशात बैतुलनजीक मूलतापी (मूलताई) हे तापीचं उगमस्थान विंध्य पर्वतात आहे. भाविक लोक ते अतिशय पवित्र मानतात. एकूण सुमारे साडेचारशे मैलांच्या हिच्या प्रवाहातील सुरुवातीचा दीडशे मैल लांबीचा भाग सातपुड्याच्या डोंगराळ भागातून वाहतो.

ब्ऱ्हाणपूरच्या पुढं ही नदी खानदेशात प्रवेश करते. तर नंतर नंदुरबारच्या पुढं गुजरातेत शिरून शेवटी सुरत जिल्ह्यात पश्चिम समुद्राला मिळते.

तापीच्या तीरावर अनेक तीर्थक्षेत्रं आहेत. त्यांतलं भुसावळजवळ पूर्णा नदीशी तिचा संगम होतो तिथं असलेलं चांगदेव हे तीर्थक्षेत्र विशेष प्रसिद्ध आहे. धुळ्याजवळचं प्रकाशे हे क्षेत्र तापीच्या काठीच असून या गावाच्या पूर्वेस गौतमेश्वराचं मंदिर आहे. दर बारा वर्षांनी सिंहस्थ यात्रा भरते. तशीच यात्रा सुरत जिल्ह्यातील बहुधान या गावीही भरते.

## ७ गंगाणीची कथा

हिमालयात एके ठिकाणी गंगा व यमुना नद्यांचे प्रवाह एकमेकींपासून १५–२० मैलांवरून वाहतात. या स्थळी एका पहाडाच्या पायथ्याशी यमुनेचं पाणी अनेक रंगांनी दर्शन देतं. घटकेत ते निळ्याकाळ्या मिश्र रंगाचं दिसतं, घटकेत ते एखाद्या खडकाशी सलगी करतं, तेव्हा मोरचुदाच्या रंगाचं बनतं. त्या पाण्याच्या लाटा खडकावर उधळतात तेव्हा त्यांतून शुभ्रधवल हास्य उमलतं. पण त्यानंतर पुन्हा ते नीलगंभीर होऊन वाहू लागतं.

गंगाणी असं म्हटल्या जाणाऱ्या या स्थानाविषयी एक कथा आहे, ती अशी–

एक ऋषी होता. गंगा व यमुना या दोन्ही पवित्र नद्यांची तो भक्ती करायचा. दररोज या दोन्ही लोकमातांचं दर्शन घेतल्याखेरीज त्याला चैन पडत नसे. तो स्नान करायचा गंगेवर जाऊन; तर राहायचा जेवायचा यमुनेच्या काठी. या दोन्ही नद्यांच्या मध्ये धिप्पाड राढी पर्वत उभा ठाकलेला होता. पण तरीसुद्धा त्याची पर्वा न करता तो पर्वत हा ऋषी जिद्दीनं ओलांडून जायचा. दोन्ही नद्यांमधलं १५–२० मैलांचं

अंतर रोजच्या रोज चालून जाणं त्याच्या अंगवळणीच पडलं होतं. पण पुढंपुढं वय झालं, तशी शरीराची शक्ती आटली. हा प्रवास ऋषीला झेपेनासा झाला. म्हणून त्यानं गंगेची प्रार्थना केली, की यातून काही मार्ग काढ. तोवरच्या त्याच्या निष्ठेनं गंगा संतुष्ट झालीच होती. तेव्हा त्याच्या प्राथेला ती तत्परतेनं पावली. यमुनेच्या काठी जिथं ऋषीचा आश्रम होता, त्या ठिकाणीच शुभ्र पाण्याच्या नवीन झऱ्याच्या रूपानं ती प्रकट झाली. ऋषीला धन्यता वाटली. नंतर जिवंत असेपर्यंत त्या नूतन गंगेच्या झऱ्यावरच गंगास्नान केलं.

## ८ आळशी बायको

एकदा एका तरुणानं लग्न केलं. पहिले काही दिवस बायकोबरोबर तो सुखानं राहू लागला. पण लौकरच त्याला आढळून आलं, की ती भारी आळशी आहे. तिला फारसं काही कामच करायला नको. घरातलं स्वयंपाकाचं थोडंसं काम करून ती वेळ मारून नेई. शेतात त्याच्याबरोबर जाऊन काम करायचं ती टाळत असे. त्यासाठी 'जिवाला बरं वाटत नाही', 'डोकं दुखतंय– अंग दुखतंय' अशा नाना सबबी ती पुढं करायची. जेवण करण्यातही ती हात राखून काम करायची. दोघांच्या जेवणासाठी जास्त तांदूळ निवडावे लागत म्हणून कमी तांदळाचा भात करी आणि नवरा येण्याआधी आपण पोटभर जेवून घेई नि नवऱ्याला थोडासा भात ठेवी. अशीच कथा इतर पदार्थांची. शेतकामावरून दमूनभागून येणाऱ्या नवऱ्याला पोटभर जेवणही मिळत नसे.

आपली बायको चांगली धट्टीकट्टी असताना नेहमी प्रकृती बरी नसल्याची कुरकूर का करीत राहते– याचा उलगडा नवऱ्याला होईना. बहुधा कुण्या भूतपिशाच्चानं तिला पछाडलं असलं पाहिजे, असा तर्क त्यानं केला. म्हणून तिला नकळत तो गावच्या मांत्रिकाकडं गेला अन्

काहीतरी उपाययोजना करण्याबद्दल त्यानं मांत्रिकाला सुचवलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो मांत्रिक त्याच्या घरी आला. त्यानं त्याच्या बायकोला न्याहाळून पाहिलं. तिला काही खोचक प्रश्न विचारले. त्यावरून त्याच्या लक्षात आलं, कीं तिला कसलाही आजार झालेला नाही. ती आजाराचं केवळ ढोंग करते नि आळशीपणापायी कामचुकारपणा करते. पण त्यानं तसं काहीएक बोलून दाखवलं नाही. उलट तिच्या नवऱ्याला तो म्हणाला, " हिला कोणत्या भूतपिशाच्चानं पछाडलंय ते मी माझ्या मंत्रांनी शोधून काढतो नि मग उपचार करतो."

मग तो मांत्रिक रानात गेला नि भोपळ्याएवढे दोन मोठाले कंद त्यानं जमिनीतून उकरून काढले. ते घेऊन तो त्या शेतकऱ्याच्या घरी गेला. आजूबाजूच्या बऱ्याच लोकांना बोलावून घेतलं. बरीच बायकामुलंही जमली. नंतर त्यानं त्या तरुणाच्या बायकोला घराबाहेर बोलावलं. काहीतरी मंत्र पुटपुटल्यासारखं करीत तिच्या कपाळावर प्रथम शेंदूर फासला, तिच्या माथ्यावर शेणपाणी ओतलं. मग ते दोन मोठाले कंद दोराला बांधून तिच्या गळ्यात लोंबकळत सोडले आणि



गावच्या रस्त्यावरून तीन फेऱ्या मारायला तिला सांगितलं. तीन फेऱ्या पुऱ्या झाल्या, की तिच्या अंगातलं पिशाच्च निघून जाईल, असं तो म्हणाला. शेतकऱ्याच्या बायकोला बोलायला तोंड नव्हतं. ती मुकाटयानं फेऱ्या घालू लागली. भोवती जमलेली मुलं चेष्टेनं खिदळत ओरडू लागली. ती बायको पहिल्याच फेरीला पार शरमून गेली. हे पाहून तो मांत्रिक तिला म्हणाला, "अंगातलं पिशाच्च जाऊन तू नीट माणसात येशील तेव्हाच गळयातले कंद काढायचे नि घरी जाऊन आंघोळ करायची. घरची नि शेतावरची कामं नीट करायला तू तयार होशील तेव्हाच तू चांगली सुधारलीस, असं होईल. कामचुकारपणा करायला लावणारं पिशाच्च अंगातनं साफ जायला हवं !"

मांत्रिकाची सूचना तिच्या लक्षात आली. आपला आळशीपणा टाकून देण्यावाचून गत्यंतर नाही हे तिला कळून चुकलं. शरमेनं ती एवढी ओशाळली होती, की पहिली फेरी संपण्यापूर्वीच आपल्या अंगातलं पिशाच्च गेल्याचं तिनं कबूल केलं; नि धावतच ती घरात आंघोळ करायला गेली:

पण मांत्रिकानं शेवटचं बजावलं, "यापुढं नेटानं सारं काम करीत राहिलीस म्हणजे हे पिशाच्च पुन्हा तुझ्या वाटेला जायचं नाही बघः तेवढी खबरदारी घे: नाहीतर पुन्हा अशा फेऱ्या घालण्याची पाळी येईल !"

पण तिनं पुन्हा तशी पाळी येऊ दिली नाही. घरचं नि शेतावरचं काम ती नीट करू लागली होती,

## ९ कुमारषष्ठी

आषाढ शु. ६ : या तिथीला कुमारषष्ठी म्हणतात व कुमारव्रत करतात. या व्रताची देवता कार्तिकस्वामी असून त्याची मयूरवाहन असलेली मूर्ती बनवून तिची पूजा करतात. या दिवशी उपोषण करून फक्त ब्राह्मीचा रस व तूप यांवर रहायचं असतं.

या व्रतामुळं बुद्धिमत्ता व पांडित्य लाभतं, असं फल सांगितलं आहे.

## १० आंब्याच्या आकाराची गोष्ट

आंब्याला– विशेषत: कलमी आंब्याला बाकदार टोक असतं ते त्याला कसं लाभलं त्याबद्दलची एक आख्यायिका आहे ती अशी–

रामायण कालापूर्वी सगळेच आंबे गोलसर आकाराचे असायचे: त्यामुळे ते इतर फळांसारखे दिसायचे. नीट माहिती असल्याशिवाय आंबे म्हणून चटकन् कळायचे नाहीत.

तर रामायणकाळात वानरसेना घेऊन, दक्षिण भारतातील जंगलांतून लंकेकडं जात असताना, हनुमानाला काही झाडं हिरव्या–पिवळ्या–नारिंगी अशा रंगांच्या फळांनी लगडलेली दिसली. त्या वेळी तो एकटाच होता. बाकीचे वानर बरेच मागं होते. सावकाश येत होते: हनुमानाला भूक लागली, म्हणून एका झाडावर चढून प्रथम त्यानं एक फळ काढून चाखून बघितलं. तर ते त्याला चांगलंच रूचकर स्वादिष्ट लागलं. म्हणून त्यानं तशी आणखी थोडी फळे काढून खाल्ली. ती खाताच त्याला बरीच तरतरी आली. त्या फळांचे हे गुण पाहून अजब वाटलं. कारण अशा प्रकारची फळं त्यानं आधी कधी खाल्ली नव्हती. ही फळं तरी कसली ? असा प्रश्न त्याला पडला.

तेवढ्यात रानात लाकूडफाटा नेण्यासाठी आलेल्या दोनतीन खेडुत बाया जवळच त्याला दिसल्या: त्यांना त्यानं त्या फळाचं नाव विचारलं. त्या हसतच म्हणाल्या, “वा: ! या फळांचं नाव तुला माहीत नाही म्हणजे नवलच म्हणायचं ! अरे, आंबे म्हणतात यांना. फार चवदार अन् पौष्टिक असतात ही, बरं का !

त्या बाया निघून गेल्यावर एका झाडाखाली बसून, आंब्याच्या फळांकडं बघत हनुमान विचार करू लागला : माझे वानरभाई मागून येताहेत: मी तर पुढं जाणार आहे. तेव्हा त्यांना हे आंबे इतर फळांपेक्षा चविष्ट अन् पौष्टिक आहेत हे कसं कळणार ? या फळांचं खास वैशिष्ट्य तसं काही त्यांच्या ध्यानी येणार नाही. अर्थात् या फळांकडं त्यांचं लक्ष वेधेल असं काहीतरी करायला हवं. काय करावं बरं ?...”

आणि थोड्याच वेळात त्याला एक कल्पना सुचली. वाटेवरच्या

आंब्याच्या एका झाडावर चढून त्यानं एकेका आंब्याच्या खालचं टोक दाबून, वाकवून बाकदार टोकेरी बनवलं. त्यामुळं त्या आंब्यांना खास असा वेगळा आकार आला. मग इतर झाडांवरच्या आंब्यांनाही त्यानं तसाच आकार दिला. आणि 'आता माझ्या वानरभाईंचं लक्ष या फळांकडं गेलं, म्हणजे त्यांना निश्चित कळून चुकेल की, ही काही वेगळीच फळं आहेत. अर्थात् ते ही आस्थेनं खातील !' असा विचार करून निश्चित मनानं हनुमान आपल्या मार्गानं पुढं निघून गेला.

तेव्हापासून आंब्याच्या टोकाला वांकदार आकार लाभला तो कायमचा.

## ११ एकादशीची गोष्ट


आषाढी एकादशीची यात्रा पंढरपुरास भरते.

आषाढ शुद्ध एकादशीला 'शयनी' एकादशी म्हणतात. 'महाएकादशी' असंही म्हटलं जातं. या एकादशीपासून कार्तिक शुद्ध एकादशीपर्यंत श्रीविष्णू क्षीरसागरात शेषावर शयन करतो, अशी पौराणिक कथा आहे.' विष्णुशयनोत्सव ' नावाचं व्रत या शयनी एकादशीला करतात. या व्रताची कथा पुढीलप्रमाणं सांगितली आहे–

त्रेतायुगात बली हा दैत्य देवांना जिंकून त्रिभुवनाचा सम्राट बनला होता. त्यावेळी श्रीविष्णू वामनाचा अवतार घेऊन बलीच्या यज्ञमंडपात गेला. आपली अवघी तीन पावलं मावतील एवढी भूमी त्यानं बलीकडं मागितली. तेवढ्या भूमीचं दान देण्यासाठी बली सरसावला. दानाचं उदक त्यानं वामनाच्या हातावर सोडलं. तेव्हा वामनानं अवघ्या दोन पावलांनी त्रिभुवन पादाक्रांत केलं. अजून तिसरं पाऊल उरलं होतं. ते आता कुठं ठेवायचं, असा प्रश्न उभा राहिला. तेव्हा दानाची पूर्तता करण्यासाठी बलीनं वामनाला, त्याचं तिसरं पाऊल आपल्या माथ्यावर ठेवायला सांगितलं. वामनरूपी विष्णूनं त्या पावलानं बलीला रसातळात

दडपून टाकलं. तो दिवस आषाढी एकादशीचा होता. तर त्या दिवसापासून वामन अवतारात विष्णू बलीच्या दारी तिष्ठत उभा राहिला; तर खुद्द विष्णूच्या रूपात, त्याच दिवशी क्षीरसागरात त्यानं शयन केलं.

## १२ कमळं पाण्यातच का उगवतात ?



फार पूर्वीच्या काळी कमळं जमिनीवर वाढायची, उगवायची. कमळाच्या पाकळ्या व आतले केसर नाजूक, मुलायम असल्यानं देवी लक्ष्मी त्या फुलात सुखानं वास करायची. हातांतही कमळं धरायची. तर ती कमळं पाण्यात का उगवू लागली त्याबद्दलची ही दंतकथा :

लक्ष्मीला कमळं आवडतात म्हणून माणसं लक्ष्मीच्या पूजेसाठी कमळं पैदा करीत. मुलांना सांगून कमळं आणवीत. त्या काळी कमळं जमिनीवरच उगवत असण्यानं ती खुडून आणणं अगदी सोपं होतं. त्यामुळं आडदांडपणानं वाट्टेल तशी कमळं तोडीत. पूजेसाठी लागणाऱ्या कमळांखेरीज घरात फुलांची सजावट करण्यासाठी म्हणून सर्रास कमळं तोडीत.

हा जाच कमळाच्या रोपट्यांना सहन होईनासा झाला. त्यांनी देवी लक्ष्मीला साकडं घातलं : 'तुझी पूजा करण्याच्या निमित्तानं आमच्या फुलांची बेसुमार तोड चाललीय आजकाल. आम्हाला उसंत म्हणून लाभू देत नाहीत. आमचं हे दुःख दूर करण्यासाठी तू काहीतरी उपाय कर. कमळांना गुलाबासारखे काटे असतील, असं कर ना! म्हणजे मग कमळं खुडणं कठीण जाईल मुला-माणसांना."

"वा: ग वेड्यांनो," लक्ष्मी त्यांची सूचना उडवून लावीत हसत उद्गारली, "अग, कमळांना काटे उगवतील असं केलं तर ती मी हातात कशी धरू शकेन ?"

"तर मग आम्हाला वाईट वास येईल, असं कर." कमळाची रोपटी तिला विनवू लागली.

"म्हणजे मग मला कमळात राहायलाच नको," लक्ष्मी उद्गारली. "घाणेरड्या वासानं उबग येईल की मला.

"तरी पण...चिंता करू नका. काहीतरी मार्ग काढू आपण यातनं." लक्ष्मी दिलासा देत म्हणाली. मग किंचित् विचार करून ती पुढं म्हणाली : यापुढं तुम्ही फक्त पाण्यात उगवाल असं करते मी. म्हणजे मग सहजासहजी कमळं खुडता येणार नाहीत कुणाला. बेसुमार तोडीला नक्कीच आळा बसेल!"

ही कल्पना कमळाच्या रोपांना पसंत पडली. आणि तेव्हापासून तलावांत, सरोवरांत किंवा देवळांलगतच्या तळ्यांत कमळं उगवू लागली. मग काय, मुलांनाच काय, पण मोठ्या माणसांनाही पाण्यात शिरून कमळं तोडणं ही कष्टाची बाब होऊन बसली. त्यामुळं काठालगतची पूजेपुरती चारदोनच कमळं लोक खुडून नेऊ लागले. कमळांच्या सजावटीची बाकीची हौस ते, कमळांची रांगोळी लक्ष्मीपुढं किंवा उंबरठ्यापुढं वगैरे काढून भागवू लागले.

# १३ कळसूत्री बाहुल्या

फार फार पूर्वीच्या काळी, कोण्या एका गावी बाहुल्या बनवणारा एक अत्यंत कसबी कारागीर होता. तो अत्यंत सुंदर बाहुल्या बनवी व त्या भारतभर खपत.

या कारागीराला सातेक वर्षांची मुलगी होती. तिच्यावर त्याची भारी माया. एके दिवशी ती मुलगी आजारी पडली. डोळे न उघडता ती सतत आठवडाभर बिछान्यावर पडून राहिली. सातव्या दिवशी तिनं डोळे उघडले, पण तिला चालता येईना, हातही हलविता येईनात. बरेच वैद्य आणले. त्यांचे सगळे औषधोपचार झाले, पण गुण काही येत नव्हता. एका वैद्याचं असं म्हणणं पडलं की, ती हात हलविण्याचा किंवा चालण्याचा आपणहून प्रयत्नच करीत नाही. तसं करायला तिला प्रवृत्त करील, असं काही तरी करायला हवं.

वैद्याच्या या म्हणण्यावर त्या बाहुलीवाल्या कारागीरानं त्या दिवशी संध्याकाळपर्यंत विचार केला. त्या रात्री तो निजलासुद्धा नाही. त्याला एक कल्पना सुचली होती, आणि त्याप्रमाणं नवीन तऱ्हेची एक बाहुली तो बनवू लागला होता.

या नवीन बाहुलीचे हात-पाय त्यानं सुटेसुटे बनवून, ते हलतील असे सैलसर जोडले. मग हातपायांच्या सांध्याशी चांगले लांब दोरे बांधले. मग त्यानं छोटासा आटोपशीर असा रंगमंच तयार केला. त्यावर पडदेही टांगले. मध्यभागी टांगलेल्या पडद्यापुढं ती बाहुली उभी केली, आणि तिच्या हातापायांना बांधलेले दोरे आपल्या हातात घेऊन तो स्वत: त्या पडद्यामागं दडून राहिला. हातातले निरनिराळे दोरे ओढले, की त्या बाहुलीचे हात किंवा पाय हलायचे: आपल्या कल्पनेप्रमाणं बाहुली नाचायला लागली हे पाहून बाहुलीवाला खूष झाला. त्या बाहुलीला मग त्यानं गावातल्या म्हाताऱ्या गवळ्यासारखे कपडे चढवले.

दिवस उजाडला, तसा तो रंगमंच यानं मुलीच्या बिछान्यापाशी, तिच्यासमोर मांडला. आणि तो स्वत: पडद्यामागं वाट पाहत उभा राहिला.

तिनं डोळे उघडताच त्यानं बाहुलीचा खेळ सुरू केला. बाहुला गवळी आपले हात हालवीत बाहुली गाईचं दूध काढताना दिसू लागला. तो चमत्कार पाहून मुलगी चकित होऊन डोळे टवकारून पाहू लागली. तेवढ्यात रंगमंचावरचा तो गवळी कप पुढं करीत उद्‌गारला—

"हे घे तुझं दूध, बेटा."

मुलीचं आश्चर्य आणखी वाढलं; आणि आश्चर्याच्या भरात तिनं हलकेच आपला उजवा हात पुढं सरसावला.

तेवढ्यात त्या गवळ्याचा आवाज ऐकू आला—

"छान छान !... खेळण्यांच्या देशातून आलोय् मी, बेटा. तू आजारी असल्याचं कळलं म्हणून आलो मी. आता उद्या मी दुसऱ्या कुणाला तरी पाठवीन, बरं का !"

त्या रात्री बाहुलीवाल्यानं त्याच बाहुलीला फुलवालीचा— माळणीचा वेष चढवला. मग दुसऱ्या दिवशी सकाळी त्या माळणीनं फुलांची माळ बनवली, अन् हात सरसावून ती मुलीपुढं धरली.

आश्चर्यचकित झालेल्या मुलीनं बेभान होऊन आपले दोन्ही हात पुढं केले.

त्या रात्री बाहुलीवाल्यानं त्या नाचऱ्या बाहुलीला तमाशातल्या नाचणारणीचा वेष चढवला.

दुसऱ्या दिवशी सकाळी, डफ-ढोलक्याच्या आवाजानं मुलगी जागी झाली. नाचणारीण बोलली— "खेळण्यांच्या देशातून आलेय् मी: चल, बेटी. टाळ्या वाजवून पायांनी ठेका दे पाहू." आणि ती बाहुली नाचू लागली.

हर्षभरानं मुलगी हळूहळू टाळ्या वाजवू लागली. अन् पाय हालवीत ठेकाही देऊ लागली,

"वा: ! वा: ! छान...छान !" बाहुली उद्‌गारली. "आता पुढं येऊन माझा हात धर पाहू."

हसतमुखानं मुलगी स्वत:ला सावरीत हळूहळू उठली नि सावकाश पावलं टाकीत रंगमंचाकडं चालत गेली. मग तिचा हात धरून बाहुली नाचू लागली.

अशा प्रकारं ती मुलगी चांगली बरी झाली. तिच्या बापानं आणखी बऱ्याच कळसूत्री बाहुल्या बनवल्या. गावातल्या सगळ्या मुलांना जमवून त्यांच्यासमोर कळसूत्री बाहुल्यांचा खास खेळ करून दाखवला. मुलं बेहद्द खूष झाली.

आणि तेव्हापासून कळसूत्री बाहुल्यांचा खेळ भारतभर नावारूपाला आला.

## १४ प्रसंगावधान !

महम्मदशहा दिल्लीचा बादशहा होता तेव्हाची गोष्ट : महम्मदशहानं इराणचा बादशहा नादीरशहा याला एकदा मेजवानी दिली. मेजवानीपूर्वी दोघे मद्यपानास बसले. तर महम्मदशहाच्या वजिरास मद्याचे पेले देताना पंचाईत पडली. पेला कुणाच्या हाती आधी द्यावा ? आपल्या धन्याला की नादीरशहाला ? (नादीरशहानं काही दिवसांपूर्वीच महम्मद शहावर विजय मिळवून दिल्ली हस्तगत केली होती. अर्थात् त्याचा मान मोठा होता.) दोघांतल्या कुणा एकाला आधी पेला दिला, तर दुसऱ्याची आपल्यावर खप्पा मर्जी व्हायची व आपल्याला कडक शासन व्हायचं, ही धास्ती.

तेवढ्यात त्याच्या सुपीक डोक्यानं त्याला युक्ती सुचवली. त्यानं पहिला पेला नादीरशहाकडं वळवलासा केला, अन् मध्येच माघार घेत तो पेला आपल्या धन्यापुढं करीत तो म्हणाला : "खाविंद, मी हा पेला त्यांना देणं बरं दिसणार नाही. सरकारांनीच आपण स्वतः हा पेला सम्राटांना देऊन त्यांचा मान करावा."

त्यानं योजलेली ही चतुर क्लृप्ती पाहून दोघेंही त्याच्यावर खूष झाले.

## १५ गुरुपौर्णिमा

आषाढ पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा असं मानतात व त्यादिवशी व्यास-पूजा करतात. आद्य शंकराचार्य हा व्यासमहर्षींचाच अवतार या श्रद्धेनं संन्यासी मंडळी या दिवशी व्यासपूजा म्हणून शंकराचार्यांची पूजा करतात. याच दिवशी दीक्षागुरू, मातापिता यांची पूजा करण्याचीही प्रथा आहे.

तमिळ राज्यात मात्र ज्येष्ठ पौर्णिमेस व्यासपूजा करण्याची प्रथा आहे. शंकराचार्यांची दक्षिण भारतातील प्रसिद्ध पीठं कुंभकोणम् व शृंगेरी इथं व्यासपूजा महोत्सव साजरा होतो.

सर्व ज्ञानांचा उगम व्यासांपासून होतो, अशी भारतीयांची धारणा असल्यानं, गुरुपरंपरेत व्यासांना सर्वश्रेष्ठ गुरू मानण्यात येतं.

या गुरुपूजेचा विधी सांगितला आहे, तो असा—

स्नान वगैरे आटोपून 'गुरुपरम्परासिद्धयर्थं व्यासपूजा करिष्ये' असा संकल्प करतात. पुढ्यात धुतलेलं वस्त्र पसरतात आणि त्यावर गंधानं पूर्व-पश्चिम व उत्तर-दक्षिण अशा बारा रेषा काढतात. हे व्यास-पीठ मानतात. मग या व्यासपीठावर ब्रह्मा परापरशक्ती, व्यास, शुकदेव, गौडपाद, गोविंदस्वामी व शंकराचार्य यांचं आवाहन करून त्यांची षोड-शोपचार पूजा करतात.

---

## १६ रुद्रचा महिमा

रुद्र ही वरुणाप्रमाणे भयंकर स्वरूपाची देवता आहे. रोग पसर-विणारे बाण हे त्याचे शस्त्र. असे रोग नाहीसे व्हावेत म्हणून रुद्राची प्रार्थना करतात. वादळातुफानाशीही त्याचा इन्द्राप्रमाणे संबंध आहे. पर्वतात राहणारी ही देवता भीतिदायक समजली गेली आहे. मात्र ती औषधींचे संरक्षण करणारी असल्याचेही म्हटले आहे. पुढील काळात रुद्र ही संहारदेवता म्हणून प्रसिद्ध पावली.

# १७ देवीचा बळी ह्युएन्सांग

ह्युएन्सांग भारतात आला. ‘ नगरहर प्रांतातल्या एका पर्वतीय गुहेत, गौतम बुद्धाची काया, शाश्वत राहील अशा तऱ्हेने सुरक्षित ठेवलेली आहे ’ असा विश्वास त्या काळात होता. ह्युएन्सांग त्या गुहेत पोचला. ध्यानमग्न झालेल्या त्याला गौतमबुद्धाचा साक्षात्कार झाला.

त्यानंतर तो प्रयाग क्षेत्री जाण्याकरिता नौकेत बसला असता, काही डाकूंनी त्याला धरले व ह्युएन्सांग हा देवीला बळी देण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गुणांनी सुसंपन्न असल्यामुळे त्याचा बळी देण्यासाठी घेऊन गेले. त्यावेळी त्याचे सोबती असहायतेने बघत राहिले.

ह्युएन्सांगचा बळी देण्यासाठी म्हणून डाकूंनी त्याला देवीच्या मूर्तीपुढे नेले. तेव्हा त्याने गौतमबुद्धाचे स्मरण केले व ‘ पुढच्या जन्मीतरी मनोकामना पूर्ण करण्याची शक्ती द्यावी ’ अशी मनोमनी प्रार्थना केली. त्यानंतर बळी जाण्यास आपण सिद्ध असल्याचे त्याने डाकूंना सांगितले.

एकाएकी सोसाटयाचा वारा सुटला. मोठ्ठाले वृक्ष त्या वादळाने उन्मळून पडत असता भयंकर ध्वनी होऊ लागला. ते पाहून ह्युएन्सांगच्या सोबत यात्रा करणाऱ्या एकाने डाकूंना असे सांगितले, “ तुम्ही जर या महात्म्याचा बळी दिलात तर तुमचा सर्वनाश निश्चित समजा! ”

ते ऐकून, त्या डाकूंनी त्याला सोडले. ते त्याच्या पाया पडून क्षमायाचना करू लागले. ह्युएन्सांगने डाकूंना समजाविले– “ तुम्ही जे पापकर्म करताहात, त्याचे प्रतिफळ म्हणून कधी न कधी तुम्हाला भयंकर प्रायश्चित भोगावेच लागेल. तुम्ही जसा दुसऱ्यांचा छळ केला आहे, तसाच एके दिवशी इतरांकडून तुमचाही छळ होईल. ”

ह्युएन्सांगकडून असा उपदेश ऐकून डाकूंनी आपली सर्व हत्यारं गंगेत फेकून दिली व “ आम्ही यापुढे साधूसारखे जीवन जगू. ” असे वचन त्यांनी दिले. ते ऐकून ह्युएन्सांगला अतिशय आनंद झाला. त्याने डाकूंना हृदयस्फूर्त आशीर्वाद दिला. त्यानंतर तो पुढील प्रवासास लागला.

# १८ गुणांची पारख

जगप्रसिद्ध फ्रेंच बादशहा नेपोलियन याच्याबद्दलची गोष्ट. एक नामवंत चित्रकार एकदा एका बड्या माणसाचं शिफारसपत्र घेऊन नेपोलिअनकडं गेला. चित्रकाराचा पोषाख गबाळा होता. त्यावरून नेपोलिअनला वाटलं, की हा कुणीतरी सामान्य माणूस असावा! म्हणून त्यानं त्या चित्रकाराचं अगत्यानं स्वागत न करता, एका बाजूला काही वेळ बसून राहायला सांगितलं.

मग आपली इतर कामं उरकल्यावर सवड सापडली, तेव्हा नेपोलिअननं, काहीशा उदासीनपणेच त्याची चौकशी केली. पण बोलता-बोलता बोलणं वाढत गेलं अन् त्या चित्रकाराच्या अंगचे चातुर्य, चाणाक्षपणा, इ. गुण नेपोलिअनच्या प्रत्ययास आले. एवढंच नव्हे, तर त्याला त्या चित्रकाराबद्दल आदर वाटू लागला. त्यामुळं साहजिकच शेवटी त्या चित्रकाराला निरोप देताना तो स्वतः उठून जातीनं त्याला दारापर्यंत अगत्यानं पोचवायला गेला. चित्रकाराला या प्रकाराचं मोठं अजब वाटलं. प्रारंभी आपलं स्वागत करण्याबाबत अनास्था दाखवणारा हा बादशहा सत्कारपूर्वक आपल्याला निरोप कसा काय देतोय याचा बोध त्याला होईना. अखेर न राहवून त्यानं नेपोलिअनला आपली शंका बोलून दाखवली तेव्हा नेपोलिअन म्हणाला–


"याचं इंगीत असं आहे की– प्रारंभी अनोळखी माणसांचे जे आगतस्वागत केलं जातं ते त्याचा पोषाख आणि बाह्यदर्शन यांवरून. तेच त्याला निरोप देताना त्याला जो आदरभाव दाखवण्यात येतो, तो त्याच्यात आढळून आलेल्या गुणविशेषांवरून!"



# १९ भामटयाची गोष्ट

ऱ्याच वर्षांपूर्वी, पण प्रत्यक्ष घडलेली म्हणून एक गोष्ट सांगतात ती अशी—

संध्याकाळची वेळ. पुण्यातल्या बुधवार चौकातल्या एका गंध्याच्या दुकानाच्या बाहेरच्या आडव्या फळीवर एक पेन्शनर दुकानदाराशी गप्पा मारीत बसले होते. एक पाय आडवा फळीवर, तर दुसरा खाली लटकत, झुलवीत ठेवलेला. गप्पांच्या नादात त्यांच्या झुलत्या पायातली वहाण कधी खाली पडली ते पेन्शनरबुवांच्या काही लक्षात आलं नाही.



पण त्या अपेक्षेनं टेहळीत पलीकडं उभ्या असलेल्या एका भामटयानं कुणाच्या नकळत ती वहाण गुपचूप उचलली अन् ती आपल्याजवळच्या फडक्यात गुंडाळून खाकोटीत लपवून ठेवली.

रात्र वाढत गेली तसे पेन्शनरबुवा घरी जायला उठले. तर एका पायातली वहाण गायब. आजूबाजूला त्यांनी खूप शोधलं, पण ती सापडली नाही ती नाहीच.

तेवढयात, बाजारहाट करायला गेलेला त्यांचा नोकर तिथं आला.

तेव्हा ते त्याला म्हणाले, "हे बघ, माझी एक वहाण हरवलीय. तर तू असं कर– उरलेली ही वहाण आपल्या तुक्या मोच्याकडं नेऊन दे. म्हणावं याच्या जोडीची दुसरी वहाण ताबडतोब तयार कर. उद्या हवी. मी जातो आता अनवाणीच घरी. विसार म्हणून ही अधेली दे त्याला."

पेन्शनरबुवा सरळ घरी गेले. तर नोकर तुक्या चांभाराकडं गेला अन् त्याला उरलेली वहाण व अधेली देऊन, निरोप सांगून घराकडं वळला.

झालं होतं असं, की–एक वहाण पळवणारा तो भामटा, पेन्शनरबुवा नोकराला सूचना देत असताना पलीकडं उभा होताच. त्यानं सारं ऐकलं होतं. तो लगेच त्या नोकराच्या मागोमाग गेला. नोकर तुक्या चांभाराला निरोप सांगून निघून गेला, हे त्यानं थोडचा अंतरावरून पाहिलं. आणि नोकर थोडा दूर निघून जाताच तो भामटा धावतपळत आल्यासारखा गडबडीनं तुक्या चांभाराकडं गेला. त्याला म्हणाला, "अरे, आत्ता तुला त्या नोकरानं दिलेली ती वहाण परत दे बघू. मालकांची हरवलेली दुसरी वहाण ही बघ परत मिळाली. म्हणून तुझ्याकडं पाठवलेली वहाण परत आणायला लगोलग धाडलंय त्यांनी मला. जोडीची ती वहाण दे अन् विसारासाठी दिलेली अधेलीपण."

जोडीची वहाणच त्यानं दाखवली म्हटल्याबरोबर चांभाराला साहजिकच त्याचं म्हणणं खरं वाटलं; आणि ती जोडीची वहाण व अधेली त्यानं त्याला देऊन टाकली.

वहाणांचा पुरा जोड अन् वर अधेलीची दक्षणा घेऊन भामटे महाशय आपल्या शिताफीवर खूष होऊन आपल्या घरी परतले.

दुसऱ्या दिवशी पेन्शनरबुवा, त्यांचा नोकर अन् तुक्या चांभार यांची कशी काय बोलाचाली झाली असेल याची कल्पनाच केलेली बरी!

□

## २० न्यायाची सचोटी

जुन्या काळच्या– १९ व्या शतकाअखेरच्या रूमशाम या पश्चिम आशियातल्या मुस्लिम देशात स्मर्ना नावाचं मोठं शहर होतं. तिथं एक मुस्लिम दुकानदार होता. त्याचा मुलगा नायब काजी बनला. तो सचोटीचा, कडक शिस्तीचा होता. न्यायाच्या बाबतीत आप-पर भाव मानणारा नव्हता.

आपल्या अधिकारपदाची सूत्रं हाती घेताच त्यानं शहरातल्या बाजारपेठेत देखरेख सुरू केली. कोणी दुकानदार व्यापारी कायदा मोडून वागतो की काय याची कडक पाहाणी तो करू लागला. कुणाकडून कायदा पाळण्यात कसूर होत असल्याचं आढळलं, तर त्याला तत्काळ शिक्षा करण्याची कारवाई त्यानं आरंभली.

अशीच एके दिवशी दुकानदारांच्या वजनमापांची तपासणी त्यानं सुरू केली. एकेकाची तपासणी करता करता खुद्द त्याच्या दुकानदार बापाची पाळी आली. खोटी वजनं-मापं वापरून फसवणुकीनं गिऱ्हाईकांना लुबाडण्याच्या कामी त्याचा बाप सरावलेला होता. त्याचा हा खोटा धंदा आजवर बिनबोभाट चाललेला होता. आता तर काय खुद्द त्याचा मुलगा नायब काजी झालेला. तेव्हा आपल्याला कुणी हटकेल, याची त्याला बिलकुल धास्ती नव्हती. त्यामुळं तो अगदी बिनधास्तपणं आपला लबाडीचा धंदा करीत राहिला होता. म्हणून वजनमापांची तपासणी सुरू झाल्याचं समजलं तरी तो बेफिकीर होता.

अधिकारी या नात्यानं मुलानं बापाला वजनमापं दाखवायला सांगितलं. पण बापानं त्याच्या बोलण्याकडं दुर्लक्ष केलं. मुलाचा हुकूम केवळ वरवरचा आहे, तपासणीचं केवळ नाटक करून तो निघून जाईल. कारण आपण त्याचे प्रत्यक्ष पिताजी आहोत, या घमेंडीत तो राहिला. पण आपला हुकूम तो हसण्यावारी नेऊन धाब्यावर बसवतोयसं पाहून मुलानं नायबाच्या आपल्या अधिकारात, आपल्या बरोबरच्या शिपायांना हुकूम सोडला : "चला रे, दुकानात बेलाशक जा आणि सगळी वजनं-मापं तपासून घ्या."

पाहिलं तर एकजात सगळी वजनंमापं खोटी आढळली. ती सारी त्यानं जप्त केली. ही अनपेक्षित कारवाई पाहून दुकानदार बाप थक्क झाला. काहीसा गांगरलाही. तरीसुद्धा यापुढं तरी आपला मुलगा बापाविरुद्ध जास्त काही करायला धजणार नाही, असा भरंवसा बापाला अजूनही वाटत होता. पण नायबाच्या अधिकारात मुलानं न्यायीपणानं वागण्यात कसूर केली नाही. कायद्याच्या रीतसर अंमलबजावणीच्या आड येणारं नातंगोतं न जुमानता त्यानं बापाला रीतसर शिक्षा सुनावली. कायद्याप्रमाणं पन्नास रुपये दंड तर केलाच; पण शिवाय पन्नास फटक्यांची शिक्षाही फर्मावली. शिपाई काहीतरी जरा कां-कूं करू लागले. पण त्यानं करडेपणानं ताकीद देताच, हुकूम देणाऱ्या अधिकाऱ्याच्या प्रत्यक्ष बापाला फटके देण्यावाचून शिपायांना गत्यंतर उरलं नाही.

शिक्षेची अंमलबजावणी पुरी होताच मात्र नायब मुलगा घोड्यावरून झट्कन् खाली उतरला, आणि त्यानं सद्‌गदित अंतःकरणानं बापाचे पाय धरले. त्याला चक्क रडू कोसळलं. अश्रूंच्या धारा बापाच्या पायांवर ओघळत होत्या. दाटून आलेल्या कंठानं तो म्हणाला : "बाबा, अल्लाच्या, सरकारच्या, स्वदेशाच्या आणि माझ्या हुद्द्याच्या दृष्टीनं माझं पवित्र कर्तव्य होतं ते मला सचोटीनं पार पाडावं लागलं. न्यायदेवता ईश्वरासमान आहे. ती आपपर संबंध जाणत नाही. तुम्हाला शासन झालं ते कोणाकडून तरी होणारच होतं. पण ते करणं माझ्याच नशिबी आलं ही खेदाची गोष्ट. पुत्रधर्माला अनुसरून मी तुमचे पाय धरून तुमची क्षमा मागतो. पण त्याचबरोबर माझं तुम्हाला विनवून असं सांगणं आहे, की यापुढं तुम्ही नीतीनं, सचोटीनं वागत जा. माझ्या हातून जे झालं— नव्हे, जे मला कर्तव्यकर्म म्हणून करावं लागलं, त्याबद्दल मला दोष न देता, तुमच्या करणीपायी माझ्यावर हा प्रसंग ओढवला हे ध्यानी आणा. मग माझी तुम्हाला दयाच येईल !"

आणि मग उठून, डोळे पुशीत तो पुन्हा आपल्या घोड्यावर चढला अन् पुढच्या कामाला निघून गेला. त्याची ही निःपक्षपातीपणाची, न्यायाची व सचोटीची वागणूक पाहून तिथं जमलेल्या लोकांनी त्याचा

जयजयकार केला. हा प्रकार सुलतानाला कळताच, त्याच्या न्याय्य वागणुकीचं योग्य चीज करण्यासाठी सुलतानानं त्याला लगेच काजीचा हुद्दा बहाल केला.

## २१ प्रामाणिक ब्राह्मण

एका गावात स्वभावकृपण या नावाचा एक ब्राह्मण राहात होता. तो भिक्षेत मिळालेल्या सातूच्या पिठापैकी खाऊन शिल्लक राहिलेले पीठ एका गाडग्यात ठेवत असे. एकदा ते गाडगे भरले तेव्हा त्याने ते खुंटीला टांगून ठेवले आणि खुंटीजवळ खाट टाकून तो खाटेवर झोपू लागला. असाच रात्री झोपण्यासाठी खाटेवर पडला असता गाडग्याकडे पाहत तो विचार करू लागला, 'हे माझे गाडगे सातूच्या पिठाने पूर्ण भरलेले आहे. दुष्काळ पडला तर हे पीठ विकून मला शंभर रुपये मिळतील. त्यातून मी दोन शेळ्या विकत घेईन. शेळ्या दर सहासहा महिन्यांनी वीत असल्याने लवकरच माझ्या घरी त्यांचा कळप तयार होईल. नंतर मी शेळ्या विकून खूप गाई विकत घेईन. त्या विकून म्हशी घेईन. म्हशी विकून घोड्या घेईन. त्या घोड्या व्याल्या की, पुष्कळ घोडे तयार होतील. ते घोडे विकून मी सोने घेईन. सोने विकून मी चार मजली घर बांधीन. मग एखादा ब्राह्मण माझ्या घरी येईल आणि आपली तरुण आणि सुंदर मुलगी मला देईल. तिच्यापासून मला मुलगा होईल. त्याचे नाव मी सोमशर्मा असे ठेवीन.

नंतर तो रांगू लागेल. एके दिवशी हातात पुस्तक घेऊन मी घोड्यांच्या पागेपाठीमागे वाचत बसेन. नंतर सोमशर्मा मला पाहून आईच्या मांडीवरून उतरेल आणि रांगत रांगत माझ्याकडे यायला निघेल. येताना घोड्यांच्या खुराजवळ येईल. तेव्हा मी रागावून बायकोला म्हणेन, 'अगोदर बाळाला उचल!' ती घरकामात गुंतलेली असल्यामुळे माझे बोलणे तिला ऐकू जाणार नाही. मग मी उठेन आणि

तिला अशी लाथ मारीन !"

विचाराच्या तंद्रीत गुंगलेल्या ब्राह्मणाने खरोखरच लाथ मारली. ती खुंटीवरच्या गाडग्यावर बसली आणि ते गाडगे फुटून ते पीठ ब्राह्मणाच्या अंगावर सांडले. त्यामुळे तो पांढुरका दिसू लागला.

## २२ डोळे साफ उघडले

एक श्रीमंत बागायतदार एका वकिलाकडं गेला आणि त्याला त्यानं, आपल्या अमुकअमुक दावेदाराविरुद्ध आपलं वकीलपत्र घेता का, म्हणून विचारलं. झालं होतं असं, की त्या 'अमुकअमुक' दावेदाराचंच वकीलपत्र त्या वकिलानं आधीच घेतलेलं होतं. म्हणून तो बागायतदाराला म्हणाला : "मी आधीच तुमच्या दावेदाराचं वकीलपत्र घेतलंय्. अर्थात तुमचं वकीलपत्र मला घेता येत नाही. मात्र मी माझ्या एका वकीलस्नेह्याला पत्र देतो. ते तुम्ही नेऊन त्याला द्या. म्हणजे तो तुमचं वकीलपत्र घेईल."

त्या वकिलानं दिलेलं पत्र घेऊन बागायतदार आपल्या घरी गेला. त्या पत्रात लिहिलंय् तरी काय, म्हणून कुतूहलानं त्यानं सहज ते पत्र उघडून वाचलं. तर त्यात मजकूर होता—'मी ज्याचं वकीलपत्र घेतलंय् तो बागायतदार व ही चिठ्ठी घेऊन तुमच्याकडं येणारा बागायतदार या दोघां मेंढ्यांची झुंज लागलीय्. ही दोघंही पैशांच्या दृष्टीनं मोठी लठ्ठ सावजं आहेत. त्यांतलं एक माझ्या हाती आलंय्. हे दुसरं तुम्ही पकडा. दोघांनाही आपण चांगलं भादरू या. दोघेही कफल्लक झाले म्हणजे त्यांचा वाद आपोआप संपुष्टात येईल.

—तो मजकूर वाचताच त्या बागायतदाराचे डोळे साफ उघडले. ते पत्र नेऊन त्यानं सरळ आपल्या दावेदाराला दाखवलं. ते पाहून आपल्या वादाचं फळ काय, हे तोही समजून चुकला. परिणामी त्या दोघांनीही आपसात समेट केला. अर्थात् ते दोघेही वकील चुरमुरे खात बसले.



म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. 9०५६ दि. २८।३।८५
विषय बाल... क्र. . . . .

## २३ थापाड्यांची जोडी

एका गावी एक थापाडा होता. त्याच्याकडं एकदा एक पाहुणा आला. तोही अट्टल थापाड्या होता. तर संध्याकाळच्या वेळी गप्पा मारताना यजमान थापाड्या पाहुण्याला सांगू लागला : "अरे, गतवर्षी आमच्या भागात बारेमाप पाऊस पडला बघ. त्यामुळं आमच्या मळ्यात भोपळ्याचं असं काही पीक आलं– काही विचारू नकोस ! मळा नुसता भोपळ्यांनी भरून गेला. बरं, ते भोपळे तरी केवढे ? एकेक वावरभर लांब अन् बाप्या माणसाच्या कवेत मावणार नाही एवढा भलामोठा !"

त्यावर सवाई थापाड्या पाहुणा बोलला : 'मी तर आमच्या गावी अजब गोष्ट पाहिली. गावच्या तांबटाकडं असा सपाटा हांडा बनवत होते, यंव् ! तब्बल पंचवीस गडी त्यावर काम करीत होते, म्हणजे बघ ! एकजण त्या हांड्याच्या पोटात उभं राहून काम करीत होता, तर त्याचं डोकं काही बाहेर दिसत नव्हतं. म्हणजे हांडा केवढा उंच होता बघ ! तोच माणूस दुपारच्या विश्रांतीच्या वेळी चक्क आडवा झोपला त्यात. तर, अशी त्या हांड्याची रुंदी. म्हणजे हांडा केवढा प्रचंड होता पाहा !"

"अरे बाप रे !" यजमान नवल करीत उद्गारला, "पण एवढा प्रचंड हांडा बनवत होते तरी कशासाठी ?"

"मलासुद्धा नवल वाटलं," पाहुणा बोलला, "म्हणून चौकशी केली. तर तो तांबट म्हणाला– तुमच्या इकडं भले सपाट भोपळे लागलेत. ते शिजवायला एवढा मोठा हंडा बनवावा लागतोय् !"

दोघेही थापाडे मनातून उमजले. यजमानानं खळखळून हसत पाहुण्याला टाळी देत दाद दिली.

▭

## २४ म्हणीचा प्रत्यय

एक काजी होता तो होता डोक्यानं अर्धवट. एकदा त्यानं एका पुस्तकात म्हण वाचली की, ' डोकं छोटं, दाढी मोठी; त्याची अक्कल बिलकुल खोटी. ' या काजीला ती म्हण लागू पडणारी होती. आता आपलं डोकं लहान आहे, त्याला काही इलाज नाही. तरीपण दाढी लांब आहे ती छाटून कमी करता येईल. म्हणजे ही म्हण आपल्याला लागू पडणार नाही.

म्हणून काजीसाहेब दाढी कापण्यासाठी कात्री शोधू लागले, पण कात्री काही सापडेना. रात्रीची वेळ होती. त्यामुळं, जिच्या प्रकाशात पुस्तक वाचलं ती मेणबत्ती बाजूला जळत होतीच. तर तिच्या ज्योती-



वर दाढी थोडीशी जाळून कमी करावी, असा विचार त्याला सुचला. लगेच त्यानं बाकीची दाढी बोटांनी दाबून धरली अन् टोक तेवढं मेण-बत्तीवर धरलं, पण दाढीच ती– भुर्रकन् जळत गेली. हाताची बोटं

भाजू लागली, तसे त्यानं मागच्या दाढीचे हात झटकन् सोडले. मग काय, मोकळी झालेली दाढी सबंधच्या सबंध तत्काल जळून गेली अन् काय !

एकूण काजीला त्या म्हणीची प्रचीती अशी आली !

## २५ चतुराईनं नामुष्की टाळली

पेशवाईच्या काळातली गोष्ट. नाना फडणविसाच्या कारभाराच्या वेळी मराठ्यांचा सरदार महादजी शिंदे एकदा पुण्यास आला होता. तर त्याची अक्कलहुशारी जोखण्याच्या इराद्यानं नाना फडणवीस व इतर कारभारी मंडळी यांनी आपसात एक मसलत केली. काहीतरी युक्ती काढून महादजीची फजिती करायचा डाव त्यांनी रचला–

श्रीमंत पेशव्यांची स्वारी हत्तीवर बसून उद्या पर्वतीवर जायला निघेल, तेव्हा बाकीच्या सर्व मंडळीनं त्यांच्याबरोबर पायी जावयाचं, असं ठरवण्यात आलं.

महादजी एका पायानं अधू होता. त्यामुळं स्वारीबरोबर चालता न आल्यानं तो मागं पडेल व साहजिकच त्याची फजिती होईल, असा कावा या मसलतीमागं होता.

कारभारी मंडळीची मसलत महादजीस वेळीच कळली. त्यामुळं तो विचारात पडला. कारण बाकीची सर्व मंडळी पायी चालत असताना आपण एकट्यानं घोड्यावर बसून जाणं योग्य नव्हे. बरं, आपण त्यांच्या-बरोबर पायी जावं तर स्वारी लगवगीनं गेल्यास आपणावर मागं पडण्याची पाळी येईल. तसं होणं नामुष्कीचं. मग करावं तरी काय ?

महादजीच्या पदरी असलेल्या जिवबा नावाच्या सारस्वत ब्राह्मणानं त्याला चिंताग्रस्त पाहून चिंतेचं कारण विचारलं. महादजीनं कारण सांगितलं. ते ऐकून जिवबा डोकं खाजवीत म्हणाला, " महाराज, यातून मार्ग काढणं काही कठीण नाही. बिलकुल चिंता करू नका. मी सांगतो तसं करा, म्हणजे झालं. उद्या पर्वतीकडं जायला निघताना श्रीमंतांची

स्वारी, अंबारीत बसण्यासाठी पुढं सरसावली, की तुम्ही त्यांचे जोडे चपळाईनं घ्यायचे आणि त्यांच्या पाठोपाठ वर चढून त्यांच्या पाठीमागं अंबारीत बसायचं. म्हणजे काम फत्ते. नाहीतरी तुम्ही श्रीमंतांचे सेवकच आहात. तेव्हा तुम्हाला त्यांचे हुजरे म्हटल्यानं फारसं बिघडणार नाही. श्रीमंतांना तर तुमच्याबद्दल कौतुकच वाटेल."

"वा: ! तुझी शक्कल नामी आहे !" महादजी हसत उद्गारला.

आणि मग दुसऱ्या दिवशी जिवबाच्या सांगण्याप्रमाणं वागून महादजीनं प्राप्त प्रसंगातून मार्ग काढला. ओढवू पाहणारी नामुष्की टाळली. एवढंच नव्हे, तर त्याच्या चतुराईबद्दल कारभारी मंडळीला त्याची तारीफ करावी लागली.

## २६ कुलाचा कलंक

एका गावात एक कुंभार राहत होता. त्याच्या घराभोवती फुटलेल्या मडक्याचे खापर इकडे-तिकडे पसरलेले असायचे. तो एकदा पळत जात असता पडला आणि खापराचा एक टोकदार तुकडा त्याच्या कपाळात घुसला. त्याचे अंग रक्ताने माखले आणि तो उठून कसातरी घरी परत आला. खापराच्या तुकड्याची ती जखम मोठी होती. त्यातच त्याने पथ्य पाळले नाही. तेव्हा ती बरी व्हायला खूपच वेळ लागला.

एकदा त्या देशात दुष्काळ पडला. तेव्हा तो भुकेने व्याकुळ झालेला कुंभार राजसेवकाबरोबर दुसऱ्या देशात गेला आणि तेथील राजाचा सेवक झाला. राजाने त्याच्या कपाळावरील जखमेची खूण पाहिली आणि त्याच्या मनात आले की, 'हा कोणीतरी वीरपुरुष असावा. समोरासमोर युद्ध करताना त्याला हा प्रहार बसला असावा.'

असा विचार करून राजाने त्याच्यावर विशेष कृपा केली आणि त्याला राजपुत्रांमध्ये स्थान दिले. त्याच्यावर विशेष मर्जी बसल्यामुळे बाकीचे राजपुत्र त्याचा मत्सर करू लागले; परंतु राजाच्या भीतीने ते काही बोलले नाहीत.

काही दिवसांनंतर त्या राजाची दुसऱ्या राजाशी लढाई सुरू झाली. राजाने वीरपुरुषांचा सन्मान केला आणि सैन्याची जमवाजमव सुरू केली. हत्ती आणि घोडे सज्ज केले जाऊ लागले. तेव्हा राजाने कुंभाराला बोलावले व एकांतात विचारले, "अरे राजपुत्रा, तुझे नाव काय ? तुझी जात कोणती ? कोणत्या लढाईत तुला हा वार लागला?"

"देव, हा शस्त्राचा वार नाही. मी कुंभार जातीचा असून माझे नाव युधिष्ठिर आहे. माझ्या घराभोवती खापराचे तुकडे पडले आहेत. मी एकदा दारू पिऊन बाहेर पडून धावत होतो, तेव्हा खापरावर पडलो. त्यावेळी जी जखम झाली त्याची ही खूण माझ्या कपाळावर आजपर्यंत आहे."

हे ऐकून राजाला स्वतःची लाज वाटली आणि तो म्हणाला, "अरेरे, राजपुत्रासारख्या दिसणाऱ्या या कुंभाराने मला फसविले. तेव्हा त्याला ताबडतोब अर्धचंद्र दिला पाहिजे."

त्याची मानगूट धरून त्याला हाकलत असता कुंभार म्हणाला, "देव, असे करू नका. रणांगणावरील माझे कौशल्य पहा."

राजा म्हणाला, "अरे, तू सर्वगुणसंपन्न आहेस. तरीही तू आता जा ! म्हणतातच की, 'बाळा, तू शूर आहेस. दिसायला चांगला आहेस आणि विद्यासंपन्न आहेस; पण ज्या कुलात तुझा जन्म झाला त्या कुलात हत्तीची शिकार करीत नसतात."

---

## २७ मूषक

सौभरी नावाचा ऋषी होता. त्याची बायको अतिशय रूपवान होती. एकदा ती क्रौंच नावाच्या गंधर्वाच्या नजरेस पडली. तिच्या सौंदर्याचा मोह पडून त्यानं तिचा हात धरला. तेव्हा सौभरी ऋषीनं संतापून त्याला शाप दिला– "तू मूषक होशील !"

ऋषीचा शाप ऐकून क्रौंच गंधर्व घाबरून गेला- तो ऋषीला शरण गेला व उःशाप द्यावा म्हणून त्याची विनवणी करू लागला. मग ऋषीनं सांगितलं– 'द्वापारयुगात तू गणपतीचं वाहन होशील आणि लोक तुला मान देऊ लागतील."

## २८ प्रायश्चित्त

एका डोंगरावर एक मोठे झाड होते. त्या झाडाच्या ढोलीत एक म्हातारे गिधाड राहात होते. त्याची नखे गळून गेली होती व ते आंधळे होते. त्या झाडावर बरेच पक्षी घरटी बांधून राहात होते. गिधाडाला उडत जाऊन आपले अन्न मिळवायची ताकद नव्हती. म्हणून दया येऊन झाडावरील इतर पक्षी त्या गिधाडाला थोडे थोडे खाणे नेऊन देत. ते खाणे खाऊन गिधाड दिवसभर ढोलीत पडून राही.

असे दिवस जात होते. एकदा एक मांजर त्या झाडावर चढले पक्ष्यांची पिल्ले खायचा मांजराचा विचार होता. मांजराला पाहून पक्ष्यांच्या पिल्लांनी एकच गोंगाट केला. तो ऐकून गिधाड म्हणाले, " कोण आहे तिकडे ?"

गिधाडाचा आवाज ऐकून मांजर घाबरले. आता काही तरी उत्तर दिले पाहिजे, म्हणून मांजर म्हणाले, " मी मांजर आहे. मी आपल्याला गुरुस्थानी मानून आपल्याला वंदन करायला आलो आहे."

गिधाड म्हणाले, " पण मांजरे तर पक्ष्यांची पिल्ले खातात म्हणून मी विचारले."

यावर मांजर म्हणाले, " मी मांसाहार सोडला आहे अशी मी प्रतिज्ञा करतो."

गिधाडाला हे खरे वाटले. मग मांजराने त्या झाडावरच मुक्काम ठोकला. पक्ष्यांची नजर चुकवून मांजर रोज पिल्लांवर झडप घाली. पिल्ले मारून झाडाच्या ढोलीत आणून खाऊन टाकी.

इकडे पिल्ले नाहीशी झालेली पाहून पक्ष्यांना दुःख झाले. ते पक्षी पिल्लांचा इकडे तिकडे शोध करू लागले. हे पाहून मांजर गेले पळून.

पिल्लांना शोधत शोधत पक्षी गिधाडाच्या ढोलीजवळ आले. त्यांना ढोलीत पिल्लांची हाडे दिसली. आपली पिल्ले हे गिधाड खाते असे समजून पक्ष्यांनी गिधाडाला हाकलून लावले.

तात्पर्य : लबाडांना आश्रय देऊ नये.


## २९ नामदेवाचा अहंकार

संत ज्ञानदेवांची कीर्ती ऐकून सन १२९१ च्या सुमाराला नामदेव त्यांना भेटायला आळंदीला गेला. तिथं इतर काही संत मंडळी जमलेली होती. नामदेवाच्या बोलण्या-चालण्यावरून त्याची अहंकारी वृत्ती ज्ञानदेवांच्या लक्षात आली. म्हणून मनाशी काही एक बेत योजून ते गोरा कुंभाराला म्हणाले : " गोरोबा, इथं जमलेल्या सर्व संतांची पारख करा पाहू. " तेव्हा गोरोबा ज्ञानदेवांपासून सुरुवात करून प्रत्येकाच्या माथ्यावर लाकडाचं थोपटणं हलकेच मारून पाहू लागला. नामदेवाखेरीज बाकी साऱ्याजणांनी हसतहसत या प्रसंगाकडं पाहिलं. पण नामदेवाला तो अपमान वाटून तो खवळला. तेव्हा गोरोबा हसत उद्गारला : " हे मडकं तेवढं कच्चं दिसतं आहे ! " मग ज्ञानदेवांनी नामदेवाची समजूत काढीत त्याला म्हटलं : " तुम्ही विठ्ठलाचे मोठे भक्त आहात यात शंका नाही. पण अहंकाराचा वारा स्वत:ला लागू न देणं हे जे खऱ्या भक्ताचं लक्षण, ते मात्र तुमच्या ठायी दिसत नाही. " नामदेवाला हे पटलं आणि तो शरमिंदा झाला.

—ही तशी आख्यायिकाच आहे. पण यातली एक गोष्ट खरी, की जमलेल्या संतमंडळीत एकटा नामदेव तेवढा गुरुखेरीज होता. बाकीज्यांचे कुणी ना कुणी गुरू होते. नामदेवाला हे जाणवलं. गुरू केल्यानं अहंकारवृत्ती दूर होईल, असं सांगून ज्ञानदेवांनी त्याला मार्गदर्शन केलं. विसोबा खेचर यांच्याकडं जायला सांगितलं.

विसोबा खेचर यांच्याशी झालेल्या नामदेवाच्या भेटीबाबतही एक दंतकथा रूढ आहे, ती अशी—

नागनाथाच्या मंदिरात विसोबांना भेटायला नामदेव गेला, तर विसोबा चक्क शिवलिंगावर पाय ठेवून आरामशीर पडले होते. नामदेवाला या गोष्टीची मनातून चीड आली. ' देवावर खुशाल पाय ठेवून पडलेला कसला हा गुरू ज्ञानदेवांनी मला निवडून दिला ? ' असं मनाशी उद्गारत, त्यानं चरफडतच विसोबांना हालवून जागं केलं आणि त्यांच्या त्या कृतीचा त्यांना जाब विचारला. तेव्हा विसोबा जागचे जरासुद्धा न



हलता शांतपणे उद्गारले : "हे पाहा, मी वयानं खूप थकलो आहे. माझे पायही उचलवत नाहीत मला. तर मेहेरबानी करून तूच माझे पाय उचल आणि शिवशंकर नसलेल्या जागी ठेव म्हणजे झालं." तेव्हा नामदेवानं त्यांचे पाय उचलून दुसरीकडं ठेवले. पण तिथंही त्या पायांखाली शिवलिंग उगवलेलं दिसलं. हा चमत्कार पाहून नामदेव थक्क झाला. तरी त्यानं चिकाटी धरून विसोबांचे पाय तिथून दुसरीकडं ठेवायचा अनेकदा आटापीटा केला. पण प्रत्येक ठिकाणी पायांखाली शिवलिंग ठाकलेलं दिसू लागलं. तेव्हा मात्र तो पार ओशाळला आणि अहंकार सोडून त्यानं विसोबांचे पाय धरले.

ही दंतकथा खरी असो वा नसो, ईश्वर फक्त त्याच्या मूर्तीत वास करीत नाही, तर तो सर्वत्र भरलेला आहे, हे दाखवून देण्यापुरतं तथ्य या कथेत आहे खास. सगुण-साकाराच्या पलीकडं परमेश्व सर्वव्यापी आहे, याचा बोध विसोबांच्या भेटीत नामदेवाला झाला एवढं खरं.

## ३० संगमरवरी फांदी

हिमालय भागात उत्तरकाशीनंतर भटवाडी लागते. तिथून सत्य-नारायण हे ठिकाण. त्याच्या थोडं पुढं गंगानदी ओलांडून पलीकडं गेलं की, उष्ण जलकुंड आहे. इथल्या झऱ्यांचं वैशिष्ट्य असं की, त्यांच्यातून निघणाऱ्या चुन्याच्या सूक्ष्म कणांचे थरावर थर चढतात नि त्यांचं चक्क वारूळ बनतं. या पाण्यात जाड पानांची एखादी फांदी पडली, म्हणजे हे पाणी तिच्यावर हळूहळू आपला प्रभाव गाजवतं. पानांचे व फांदीच्या अंगाचे सूक्ष्म कण झिजत जातात, तसतसे पाण्यातील चुन्याचे कण त्या जागांवर चपखल बसत राहतात आणि पाच-सहा महिन्यांच्या अवधीत त्या सबंध फांदीवर चुन्याचे एवढे थर चढतात की, त्या फांदीचं पार रूपांतर होतं. झाडाच्या फांदीच्याजागी संगमरवराच्या दगडासारखी दिसणारी, पण नाजूक अन् तेवढीच टणक अशी अजिबात नवीन स्वरूपाची फांदी निर्माण होते. निसर्गाची ही कलाकुसर पाहून थक्क व्हायला होतं.

## ३१ कथा दीपपूजेची

आषाढी अमावास्येला दिव्याची अवस म्हणतात. दिव्यांची पूजा करणं हे या दिवसाचं विशेष. स्त्रिया या दिवशी घरातले दिवे लखलखीत साफ करतात व ते नीट मांडून पेटवतात. मग भोवती रांगोळी काढून त्यांची पूजा करतात.

पूर्वीच्या काळी तमिळ देशात पशुपती शेट्टी म्हणून एक श्रेष्ठी होता. त्याला विनीत हा मुलगा व गौरी ही मुलगी होती. लहानपणी या दोघांत असं ठरलं की, मोठेपणी गौरीला ज्या मुली होतील, त्यांची लग्नं विनीतला होणाऱ्या मुलांशी करावीत.

मोठी झाल्यावर गौरीचं लग्न होऊन तिला तीन मुली झाल्या. तर लग्न झालेल्या विनीतला मुलगे झाले तेही तीनच.

पुढं असं झालं की, गौरीच्या घरी संपत्ती होती, पण विनीतच्या नशिबानं गोता खाल्ला– तो दरिद्री बनला. भावाचं दारिद्र्य पाहून गौरीनं आपल्या लहानपणाच्या वचनाला चक्क हरताळ फासला. आपल्या पहिल्या दोन्ही मुलींची लग्नं तिनं श्रीमंत घरं पाहून करून दिली. आता धाकटी सगुणा राहिली होती. तिलाही असंच एखादं स्थळ पाहून द्यायचे बेत ती आखीत होती, पण खुद्द सगुणाला आईचं करणं पसंत नव्हतं. आईनं भावाला दिलेलं वचन पाळलं नाही, हे समजताच तिला खंत वाटली. आता निदान आपण तरी विनीतच्या धाकटचा मुलाशी लग्न करायचं, असं तिनं ठाम ठरवलं. तिचा बेत ऐकून गौरी तिच्यावर उखडली, पण सगुणानं आपला निश्चय बदलला नाही.

अखेर सगुणानं आपल्या निश्चयाप्रमाणं लग्न केलं अन् ती सासरी– विनीतमामाच्या घरी गेली. त्याचा संसार गरिबीचा होता, तरीसुद्धा त्या कुटुंबाशी समरस होऊन ती वागू लागली. तिचे आई-बाप मात्र तिला विचारीनासे झाले.

आणि एके दिवशी एक अजब प्रकार घडला. त्या नगरीचा राजा स्नानाला गेला असता, त्यानं आपली रत्नखचित अंगठी जवळच्या कट्ट्या-वर ठेवली. तिथं अचानक एक घार आली अन् झडप घालून तिनं ती अंगठी उचलून नेली. तिथून ती उडाली, ती थेट सगुणाच्या घराच्या छपरावर येऊन बसली. पळवून आणलेली वस्तू आता निवांतपणं खावी म्हणून ती चोचीनं चाचपू लागली. तर ती वस्तू खाण्याच्या लायकीची नाही, असं तिला आढळून आलं. तेव्हा वैतागानं ती वस्तू तिथंच टाकून ती उडून गेली. ती अंगठी छपरावरून घरंगळत खाली– सगुणाच्या अंगणात पडली. ती सगुणेला मिळाली. ती राजाची हरवलेली अंगठी आहे, असं कळताच ती सरळ राजाकडं गेली अन् तिनं ती त्याला दिली. तिच्या सचोटीवर खूष होऊन राजानं तिला चांगलं बक्षीस तर दिलंच. शिवाय वर आणखी हवं ते मागून घ्यायला सांगितलं.

त्यावर किंचित् विचार करून सगुणा म्हणाली, " येत्या शुक्रवारी. रात्री सबंध राज्यात फक्त माझ्या एकटीच्याच घरी दिवे असावेत, दुसऱ्या कोणीही आपल्या घरी दिवे लावू नयेत, असा हुकूम काढाल

का ?"

राजानं तिची मागणी मान्य केली आणि त्याप्रमाणं राज्यभर दवंडी पिटायला लावली.

शुक्रवार येताच सगुणेनं शक्यतेवढे दिवे पैदा केले आणि ते घरात सगळीकडं लावले. अर्थात त्या रात्री राज्यात सगळीकडं अंधार, तर तिचंच घर तेवढं दिव्यांच्या प्रकाशानं उजळून निघालं होतं. तिनं स्वतः त्या दिवशी उपासही केला. रात्र पडू लागताच तिनं थोरल्या दिराला पुढल्या दारी उभं राहायला सांगून म्हटलं, "कुणी सवाष्णबाई घरात येऊ लागली तर, आपण या घरातून बाहेर जाणार नाही, असं शपथेवर ती कबूल करील, तेव्हाच तिला आत येऊ द्या." मग दुसऱ्या दिराला मागील दाराशी उभं राहायला सांगून ती म्हणाली, "कुणी स्त्री या दारातून बाहेर जाऊ लागली की, आपण या घरात परत येणार नाही, असं तिच्याकडून शपथेवर कबूल करून घेऊनच तिला बाहेर सोडा."

तिन्हीसांजा होताच प्रत्यक्ष लक्ष्मीनं त्या नगरीत प्रवेश केला, तेव्हा तिला चोहीकडं अंधार पसरलेला दिसला. एकट्या सगुणेचं घर तेवढं दिव्यांच्या प्रकाशात उजळलेलं दिसत होतं. साहजिकच लक्ष्मी तिच्या घरात जाण्यासाठी पुढल्या दारी आली. सगुणेचा थोरला दीर तिथं उभा होताच. घर सोडून जाणार नाही, अशी तिच्याकडून शपथ घेववल्यावरच त्यानं तिला घरात येऊ दिलं. प्रत्यक्ष लक्ष्मी घरात आलेली पाहताच, इतके दिवस घरात ठाण मांडून बसलेली दारिद्र्य-महामाया आपला गाशा गुंडाळून मागल्या दारानं पसार होऊ लागली. पण त्या दाराशी पहारा करीत उभ्या असलेल्या सगुणेच्या दिरानं, परत न येण्याची कबुली तिनं शपथेवर दिली, तेव्हाच तिला जाऊ दिलं.

त्या दिवशी सगुणेच्या घरात आलेली लक्ष्मी तिथंच कायमचा मुक्काम करून राहिली. त्यामुळं तिथं धन-धान्याची सुबत्ता झाली. सगुणेला तर लोक लक्ष्मीचा अवतार मानू लागले.

# ३२ आषाढ महिमा

भारतीय कालगणनेतला चौथा, तर ग्रीष्म ऋतूचा दुसरा महिना. याला 'शुची' असंही म्हणतात. या महिन्याच्या पौर्णिमेस किंवा त्या सुमारास पूर्वाषाढा किंवा उत्तराषाढा नक्षत्र असतं, त्यावरून या महिन्याला आषाढ हे नाव पडलं.


सूर्याचं कर्कसंक्रमण या महिन्यात सुरू होत असून तिथूनच दक्षिणायन सुरू होतं. दिवसाचा कालावधी हळूहळू कमीकमी होत जातो व रात्रीचा कालावधी तेवढ्याच प्रमाणात थोडा-थोडा वाढत जातो.

या महिन्यातील शुक्ल पक्षातल्या एकादशीला 'शयनी एकादशी' म्हटलं जातं. त्या दिवशी उपवास करण्याची प्रथा– विशेषतः महाराष्ट्रात रूढ आहे. या एकादशीनिमित्त लक्षावधी विठ्ठलभक्त वारकरी पंढरपूरची वारी करतात व त्या दिवशी श्रद्धापूर्वक पांडुरंगाचं दर्शन घेतात. या दिवसापासूनच चातुर्मास सुरू होतो.

आषाढी पौर्णिमा ही गुरुपौर्णिमा मानून त्या दिवशी व्यासपूजा करतात.

आषाढातील कृष्ण पक्षातल्या एकादशीच्या दिवशीही लाखो विठ्ठलभक्त पांडुरंगाचं दर्शन घेतात. या एकादशीला 'कामिका' एकादशी असं म्हणतात.

या महिन्याच्या अमावास्येला 'दिव्याची अवस' मानतात व दीपपूजा करतात. या दिवशी कुठंकुठं बैलपोळाही साजरा करतात.



## ३३ समयसूचकता

इसवी सनाच्या सहाव्या शतकाअखेर कनोज इथं श्रीहर्षवर्धन हा प्रख्यात चक्रवर्ती राज्य करीत होता. त्या काळच्या रिवाजानुसार राज्यारूढ झाल्यावर तो दिग्विजयाला निघाला. त्याची स्वारी सरस्वती नदीच्या तीरावर पोचली, तेव्हा त्या भागातले प्रतिष्ठित नागरिक राजास सामोरे आले. त्यांनी राजापुढं नजराणा ठेवला. हर्षवर्धनाचं नाव कोरलेली सोन्याची एक अंगठी त्यात होती. त्या नागरिकांच्या इच्छे-नुसार राजानं ती अंगठी आपल्या बोटात घातली.

मग सैन्यासह राजानं पुढं प्रयाण केलं. त्यावेळी राजा आपल्या घोड्यावर स्वार होत असताना, बोटात सैल झालेली ती अंगठी बोटातून निसटून खाली जमिनीवर पडली. तो अपशकून वाटून सर्व सैनिक व अधिकारी खिन्न झाले. राजाच्या लक्षात ती गोष्ट आली. लढाई करायच्या वेळी सैन्याची ही भावना जाचक ठरेल, हे जाणून तो विचारात पडला. पण तो समयसूचक होता. काही क्षणांतच त्यानं प्रसंगावधानानं ती अंगठी जमिनीवरून उचलली, आणि ती उंच धरून तो आपल्या सैन्याला उद्देशून ईर्ष्येनं म्हणाला,

"वीरहो, दिग्विजयाच्या दृष्टीनं हा आज आपल्याला शुभ-शकूनच झाला म्हणायचा. धरती– पृथ्वी आपल्याला आजच वश झाली, असं मानायला हरकत नाही. कारण माझं नाव कोरलेल्या मुद्रेचा ठसा तिनं स्वतःच्या अंगावर उमटवून घेतला. अशाप्रकारं पवित्र झालेली हीच मुद्रा यापुढं शासनाच्या कागदपत्रांवर उमटवली जाईल. या ग्रामस्थांमुळंच शुभशकुनाचं हे भाग्य आपल्याला लाभलं. म्हणून त्यांना योग्य ते पारितोषिक देण्याबद्दल मी कोशाध्यक्षास आज्ञा करतो. आता पराजय होण्याची आपल्याला तिळमात्र भीती बाळगायला नको."

राजाचे हे प्रोत्साहनपर उद्गार ऐकून सर्व सैनिकांची खिन्नता पार पळाली आणि त्यांचे चेहरे प्रफुल्लित झाले.

त्यानंतर प्रत्येक युद्धाच्या वेळी राजाचं ते उत्तेजनपर भाषण आठवून सैनिकांना स्फुरण चढत गेलं आणि ते आवेशानं लढत गेले. त्यामुळं हर्षवर्धनचा कधीच पराभव झाला नाही.

# ३४ से. बापटांचा सोबती

सेनापती बापट हे थोर ग्रामसेवक होऊन गेले. माणसांच्या वस्तीत पसरलेला घाण-कचरा पाहून त्यांना भारी वाईट वाटे. गलिच्छपणामुळं माणसांचं आरोग्य बिघडतं याची जाणीव लोकांना करून देण्यासाठी ते स्वत: जातीनं, हातात झाडू घेऊन ग्रामसफाई करीत.

विनोबांनीही खेड्यात राहून ग्रामसेवेचं काम केलेलं. काही दिवस चक्क भंगीकामही केलेलं होतं त्यांनी. तर एके दिवशी सेनापती बापट विनोबांच्या भेटीस गेले होते. कामाबद्दल गप्पा चालल्या असता, विनोबांनी त्यांना विचारलं, " तुमचं सफाईचं काम कसं काय चाललंय ?"

" चांगलं चाललंय." से. बापट उत्तरले. " परवापर्यंत मी एकटाच होतो, पण आता एक सोबती लाभलाय. त्यामुळं कामाचं ओझं सुसह्य झालंय."

मुंबईसारख्या प्रचंड वस्तीच्या शहरात सेनापती बापटांना अवघा एक सोबती मिळतो काय अन् त्याच्याबद्दल ते एवढ्या कौतुकानं बोलतात काय ! असा हा यांचा सोबती तरी कोण, हे जाणून घ्यायची विनोबांना उत्कंठा लागली. आपलं कुतुहल त्यांनी बोलून दाखवलं. तेव्हा सेनापती बापटांनी खुलासा केला, " हा सोबती म्हणजे आहे एक ढकलगाडी. पूर्वी सगळा कचरा मलाच उचलून वाहून न्यावा लागे. तर आता ढकलगाडी तो वाहून नेण्याचं काम करते."

आपल्या कामात दुसरा कुणी सहकारी मिळू शकला नाही, याबद्दल खेद व्यक्त करण्याऐवजी, कामाचा भार थोडा हलका झाला तो कसा, हे त्यांनी आपल्या वृत्तीत कडवटपणा येऊ न देता सांगितलं. विनोबांना त्यांच्या थोरपणाचा वेगळाच प्रत्यय आला.

## ३५ रखुमाईची कथा

विठ्ठल म्हणजे कृष्ण; आणि रखुमाई म्हणजे रुक्मिणी. त्यांच्याबद्दलची कथा अशी आहे–

कृष्ण गोकुळात होता तेव्हा राधेशी त्याचं सख्य होतं. पुढे कृष्णानं द्वारकानगरी वसवली. तो द्वारकेचा राजा झाला. तर एकदा त्याला भेटायला राधा तिथं गेली. श्रीकृष्णाच्या महालात जाऊन चक्क त्यांच्या मांडीवर बसली. श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी महालात आली, तरी राधा जागची उठली नाही. या गोष्टीचा रुक्मिणीला क्रोध आला. कृष्णाचं तोंड पाहणार नाही, अशा निर्धारानं ती तडक द्वारकेबाहेर पडली. काही तीर्थांना भेट देऊन शेवटी ती दिंडीरवनात येऊन पोचली. हे स्थळ तिला पसंत पडलं आणि तिथं तिनं तप आरंभलं.

रुक्मिणी रागावून गेलेली पाहून कृष्ण बेचैन झाला. गोकुळातल्या गोपाळांना बरोबर घेऊन त्यानं रुक्मिणीचा शोध सुरू केला. ती दिंडिरवनात असल्याचा त्याला शोध लागला. मग गोकुळपुरात गोपाळांना ठेवून तो स्वतः तिच्या तपश्चर्येच्या जागी गेला. कृष्णानं तिची नाना परींनी समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्याबरोबर घरी परतायला ती कबूल झाली नाही. उलट रागानं ती त्याला टाकून बोलली. ती आपला हट्ट सोडीत नाही, असं पाहून कृष्णाचा निरूपाय झाला. तोही मग चिकाटी धरून तिथंच तिच्यापुढं खंबीरपणे उभा राहिला.

पंढरपूरच्या विठ्ठलाच्या देवालयातही रखुमाई त्याच्या शेजारी नाहीच. तिचं वेगळं देऊळ जवळच आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, बालवाङ्मय शाखा.
दा. क्र १७५६ ता. २८।२।८५
विषय बा. वा.
BVBK-0401756